cmyk

## संपादकीय

### देशाची दिशाभूल?

भारताचे 'सीडीएस' जनरल अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या संघर्षात पाकने भारताची विमाने पाडल्या प्रकरणी खुलासा सिंगापूरला का केला? असा सवाल काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केला आहे. 'सीडीएस' चौहान यांनी विमाने पाडली गेल्याचा खुलासा सिंगापूरमध्ये केल्यानंतर काँग्रेस आक्रमक झाली आहे. रमेश म्हणाले की, लष्करी व परदेशी धोरणाबाबत सरकारने तातडीने विशेष अधिवेशन बोलावणे गरजेचे आहे. 'सीडीएस' अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बाबत महत्त्वाची माहिती सिंगापूरला असतानाच का दिली?


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### स्थानिक स्वराज्य संस्थांची अधिसूचना निघणार

मुंबई-सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत अधिसूचना या आठवड्यात निघण्याची शक्यता आहे. ६ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकार यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले होते. या अधिसूचनेसाठी ४ आठवड्यांची मुदत देण्यात आली होती. यामुळे या आठवड्यात अधिसूचना काढणे अनिवार्य असणार आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-४१ | बुधवार, दि.४ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# शेतकऱ्यांचा कांदा चिखलात माखला

## नाशिकसह राज्यभरात कांद्याला कवडीमोल भाव

**नाशिक । प्रतिनिधी**

**आधी अवकाळीने झोडपले, नंतर वळवाच्या पावसाने आणि आता मान्सूनला सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यात तुफान पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतकऱ्याचा कांदा चिखलात माखला असून बाजारात कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. हे चित्र नाशिकसह राज्यभरात असून कांद्याची नुकसान झाल्याने येणाऱ्या काळात दरही वधारणार असल्याचे बोलले जात आहे.**



आधी पूर्व मौसमी आणि आता मान्सूनची हजेरी लागल्यानंतरही काढणीला आलेली उन्हाळी पिके पाण्याखाली गेली आहेत. शेतकऱ्यांचा कांद्याच्या चाळी भिजल्या आहेत. मार्केटमध्ये नेण्यासाठी बाहेर काढून ठेवलेला कांदा आता पूर्णतः चिखलात माखला आहे. कांदा भिजल्यामुळे मार्केट यार्डात कांद्याच्या भावात मोठी तफावत दिसून येत आहे. शेतकऱ्याला क्विंटल मागे ८०० ते १००० रुपयांचा भाव मिळत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. सर्वाधिक कांद्याचे उत्पादन होणाऱ्या नाशिक जिल्ह्यात सोमवारी सकाळच्या सत्रात ६००० क्विंटल कांद्याची आवक झाली. क्विंटल मागे सर्वसाधारण दर हा १००० ते १२०० रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना मिळत आहे.

अनेक जिल्ह्यात बरसून गेलेल्या पावसाची दाहकता आता समोर आली असून शेतकऱ्यांच्या पान २ वर

> **भविष्यात कांद्याचा दर वधरणार**
>
> गेल्या काही दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे कांदा शेतातच सडला असून जो कांदा शेतकऱ्यांनी घरी आणला त्याचा दर्जाही खराब झालेला आहे. त्यामुळे तो कांदा जास्त दिवस टिकणार नसल्याचे दिसते. त्याचा परिणाम येणाऱ्या काळात कांद्याचे भावावर होणार असल्याचे म्हटले जात आहे. दर वाढणार असल्याचे चित्र असून त्याचा फटका सामान्यांना बसणार आहे.

## थोडक्यात...

### महापुरुषांवर टीका केली तर १० वर्षांची शिक्षा हवी- अबू आझमी

मुंबई-देवी देवतांवर अभ्रद्र पद्धतीने टीका करणे हे तुम्हाला पटतं का? देवी देवतांवर किंवा महापुरुषांवर कोणी खालच्या पातळीवर टीका केली तर १० वर्षाची शिक्षा झाली पाहिजे. यासाठी कायदा निर्माण झाला पाहिजे, ही मागणी मी विधिमंडळात देखील केली होती, असे अबु आझमी यांनी म्हटले आहे.

### ३ कोटीवरून १० कोटींवर बजेट नेले- आदिती तटकरे

मुंबई-यावर्षी आम्ही महिला आयोगाचे बजेट तीन कोटीवरून १० कोटी ७० लाखांवर नेले आहे. पहिल्यांदाच नंदिनी आव्हाडे यांच्याकडे आयोगाच्या सचिव म्हणून पूर्णवेळ जबाबदारी दिली. पेन्शनची प्रकरणं १० वर्षापासून पेंडीग होती. वन स्टॉप सेंटर वाढविण्याचा प्रयत्न आहे. आधी ते एन्जीओ चालवणार होते आता मात्र ते राज शासनाकडे आले आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

### बीडमध्ये ८०० महिलांच्या गर्भ पिशव्या काढल्या-ठाकूर

मुंबई-बीडमध्ये ऊसतोड कामगार आठशे महिलांच्या गर्भ पिशव्या काढल्याचा प्रकरण समोर आल्यानंतर यावर माजी मंत्री काँग्रेसचे नेत्या यशोमती ठाकूर यांनी संतप्त सवाल राज्य महिला आयोगावर उपस्थित केला. बीडमध्ये ८०० महिलांच्या गर्भपिशव्या काढल्या, महिला आयोग काय झोपला आहे काय? अतिशय शॉकींग बातमी आहे, असे यशोमती ठाकूर म्हणाल्या.

### शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता पाळावी-अमोल कोल्हे

पुणे-माणिकराव कोकाटे यांच्यावरती आता भाष्य करण्याची ती वेळ नाही. त्यांची जी वक्तव्य होती, ती कोण कोणत्या परिस्थितीमध्ये झाली ती वेगळी गोष्ट आहे. शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता कोणत्याही पदावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने पाळली पाहिजे. आजचा केंद्रीय मंत्र्यांचा दौरा या सर्वांवरती फुंकर घालणारा होता, असे खासदार अमोल कोल्हे म्हणाले.

### नरकातील स्वर्ग पुस्तकाची होळी

सातारा-खासदार संजय राऊत यांचे 'नरकातील स्वर्ग' या पुस्तकाची सातारा येथील पोवई नाका येथे शिंदे गटाच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी होळी केली. शिवसेना शिंदे गटाचे नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख रणजीतसिंह भोसले यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पुस्तकाच्या प्रती फाडून जाळून निषेध केला.

### गिरीश महाजन हे भाजपचे दलाल-संजय राऊत

मुंबई-लोकांना धमक्या देऊन पक्ष फोडण्याचे काम सुरू असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. गिरीश महाजन हे भाजपचे दलाल असल्याचा गंभीर आरोप राऊतांनी केला.

### बीडच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी- जयंत पाटील

मुंबई-बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात अवकाळी पावसाने टोमॅटो उत्पादकांची झालेली ही अवस्था अतिशय अस्वस्थ करणारी आहे. कर्जाऊ पैसे घेऊन बाग फुलवली मात्र हातातोंडाशी आलेला घास मातीत मिळाला. दुर्दैवाने कमीअधिक प्रमाणात अशीच परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळी पावसाने प्रत्येक शेतकऱ्याची केली आहे. झालेल्या नुकसानाची सरकारने संवेदनशीलतेने दखल घ्यावी. त्वरित नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना धीर द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी केली आहे.

## कुटुंबापेक्षाही काकणभर अधिक प्रेम जनतेने दिले; त्याची उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन- ना. पंकजाताई मुंडे

# लोकनेत्यासाठी गोपीनाथगडावर लोटला जनसागर !

## गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही-रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक







**परळी वै.। प्रतिनिधी**

**माझे पिता आणि आपले नेता लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे पुण्यात्मा होते. त्यांनी आयुष्यभर कोणाचेही वाईट चिंतले नाही. सदैव वंचितांचे वाली आणि वाणी होण्याचा त्यांनी मार्ग निवडला. त्यातूनच त्यांचे मोठेपण निर्माण झाले.आज त्यांच्या जाण्यानंतर अकरा वर्षांनीही हा विराट जनसमुदाय हेच दाखवून देतो. मुंडे साहेबांनंतर तुम्ही आम्हाला बळ दिलं. आमच्या परिवाराला शक्ती दिली. त्यामुळे**



**कुटुंबापेक्षाही काकणभर अधिकचे प्रेम तेम्ही केलेलं आहे. त्या प्रेमातून उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील कार्यक्रमात दिली. तर गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही असे वर्णन रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांनी कीर्तन प्रसंगी बोलताना केले.**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथ गडावर आयोजित कार्यक्रमात बोलताना ना पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी आत्मीय संवाद साधला. या ठिकाणी उपस्थित प्रत्येक जण म्हणजे गोपीनाथ मुंडे परिवार असल्याचे आवर्जून सांगत हा आपल्या परिवाराचा कार्यक्रम असुन या ठिकाणी आपण दरवर्षी येऊन ऊर्जा घेतो. लाखोंचा जनसमुदाय मला सातत्याने शक्ती देतो. हे प्रेम, ही शक्ती यापुढेही अशीच माझ्या पाठीशी राहावी अशी अपेक्षा ना. पंकजाताई यांनी व्यक्त केली. गोपीनाथ गडावर लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त रामायणाचार्य ह भ प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन झाले. पान २ वर

> **आज मुंडे साहेब असते तर देशाच्या कारभारात मोठ्या पदावर असते**
>
> यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचा संदर्भ देत ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज मुंडे साहेब असते तर निश्चितच ते देशाच्या केंद्रस्थानी कारभारात मोठ्या पदावर असते. केंद्रातील त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसोबत सदैव ते आपल्याला दिसले असते. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. त्यामुळे मुंडे साहेब आज आपल्यात नसले तरी त्यांचा वारसा, विचार आणि संस्कार आपल्या पाठीशी आहेत. त्या आशीर्वादावर निश्चितच मुंडे साहेबांना अभिप्रेत असा सामाजिक न्याय आपल्याला प्राप्त होईल असा विश्वास ना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

## स्व.मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली-बाळराजे पवार



परळी : स्व. मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली. त्यांनीच राजकारणात आणून, डोक्यावर हात ठेवलाआमच्या मध्ये एक वेगळ्या नात्याची वीण तयार झाली होती. ते ऋणानुबंध आज शब्दात सांगता येत नाहीत. अशी भावना व्यक्त करून, युवा नेते बाळराजे पवार यांनी लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराईचे गोपीनाथ गडावर जाऊन अभिवादन केले.

स्व.गोपीनाथरावजी मुंडेच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी, आपल्या भावन पान २ वर



परळी: माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी गोपीनाथ गड (पांगरी) येथील त्यांच्या स्मृती स्थळी जाऊन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुंडे परिवारातील सदस्य तथा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरकारी बाबूंना ई-मेल, व्हॉट्सअॅपवर शिस्तभंग नोटीस

### राज्य सरकारचा निर्णय; प्रशासन होणार गतीमान

मुंबई । प्रतिनिधी


सरकारी कर्मचाऱ्यांना आता शिस्तभंगाची नोटीस व्हॉट्सअॅपवर, ईमेलवरही पाठविली जाणार आहे. शिस्तभंगाच्या नोटीसीला वेळेत उत्तर देता यावे आणि यासंदर्भातील कारवाईला गती देण्यासाठी आता ईमेल आणि व्हॉट्सअॅपवरही नोटीस पान २ वर

## देशात कोरोना रुग्णांची संख्या ४ हजारावर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशात गेल्या काही दिवसांपासून कोरोना संसर्ग वाढत असल्याचे चित्र आहे. देशातील कोरोना रुग्णांची संख्या चार हजारावर गेली तर देशात आतापर्यंत ३२ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.**

सक्रिय रुग्णांच्या संख्येत २०३ ने वाढ झाली आहे, तर गेल्या २४ तासांमध्ये चौघांचा मृत्यू झाला असून ताज्या आकडेवारीनुसार दिल्लीत सर्वाधिक ४७ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २९.०० क्विंटल | २,२५० | २,७५० | २,५०३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४.५० क्विंटल | १,७०० | २,४५० | २,१५० |
| मका/लोकल:२१.५०क्विंटल | १,९०० | २,२५० | २,०७५ |
| तूर : १८.०० क्विंटल | ६,००० | ६,५५१ | ६,२७५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३१.०० क्विंटल | २,३९१ | २,४७१ | २,४३१ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:१९.५० क्विंटल | ३,९५० | ३,९५० | ३,९५० |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,३११ | ५,३११ | ५,३११ |

# वाल्मिक कराड मकोकातून सुटणार का?

## उज्ज्वल निकम यांची मोठी माहिती; पुढील सुनावणी १७ जूनला होणार

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची सुनावणी सोमवारी पार पडली. तब्बल ५० मिनिटं ही सुनावणी सुरू होती. तर आता पुढची सुनावणी १७ जून रोजी पार पडणार आहे. मकोका विशेष न्यायालयात ही सुनावणी पार पडली. वाल्मिक कराड याने आपल्याला मकोकामधून दोषमुक्त करण्याची मागणी करणारा अर्ज केला असून त्यावर १७ जूनला



फैसला होणार आहे. याबाबत अॅड उज्ज्वल निकम यांनी प्रसार माध्यमांना माहिती दिली. त्यामुळे कराड हे मकोकातून सुटणार का? याकडे आता सगळ्याचा नजरा लागल्या आहेत.

यावेळी बोलताना सरकारी वकील उज्ज्वल पान २ वर

> **सुनावणीला अॅड निकम गैरहजर राहणार**
>
> १७ जून रोजी होणाऱ्या सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हे गैरहजर राहणार असल्याचे त्यांनी स्वत: सांगितले आहे. तसेच कराड यांच्या अर्जावर हरकत घेण्यात आली नाही. त्यामुळे कराड हे मकोकातून सुटतात की काय? याविषयी सध्या तर्कवितर्क सुरु आहेत.

cmyk

## अग्रलेख

# देशाची दिशाभूल?

भारताचे 'सीडीएस' जनरल अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या संघर्षात पाकने भारताची विमाने पाडल्या प्रकरणी खुलासा सिंगापूरला का केला? असा सवाल काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केला आहे. 'सीडीएस' चौहान यांनी विमाने पाडली गेल्याचा खुलासा सिंगापूरमध्ये केल्यानंतर काँग्रेस आक्रमक झाली आहे. रमेश म्हणाले की, लष्करी व परदेशी धोरणाबाबत सरकारने तातडीने विशेष अधिवेशन बोलावणे गरजेचे आहे. 'सीडीएस' अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बाबत महत्त्वाची माहिती सिंगापूरला असतानाच का दिली? पंतप्रधान व संरक्षणमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठकीत पहिल्यांदा ही माहिती देणे गरजेचे होते, असे रमेश म्हणाले. कारगील युद्धानंतर भारताच्या संरक्षण तयारीबाबत विशेष पुनर्आढावा समिती ३ दिवसांत स्थापन करण्यात आली होती. आताही अशाच प्रकारची समिती स्थापन केली पाहिजे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचे वडील त्या समितीचे अध्यक्ष होते. त्या वेळी अहवाल संसदेत मांडून त्यावर व्यापक चर्चा झाली होती.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान झालेल्या भारत आणि पाकिस्तान संघर्षाबाबत केंद्र सरकारने देशाची दिशाभूल केली असल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी शनिवारी केला तर या संघर्षात भारताचे किती नुकसान झाले या मागचे सत्य देशाला सांगावे, अशी मागणी काँग्रेसचे नेते उत्तम कुमार रेड्डी यांनी केंद्र सरकारकडे केली. संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी सिंगापूरमध्ये एक वृत्तवाहिनी आणि काही वृत्तसंस्थांशी बोलताना 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताच्या लढाऊ विमानांचे नुकसान झाल्याची कबुली दिल्यानंतर प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने पुन्हा एकदा केंद्र सरकारला लक्ष्य केले. खरगे म्हणाले, स्वतंत्र तज्ज्ञांच्या समितीने भारताच्या संरक्षण सज्जतेचा सर्वंकष आढावा घेतला जावा, अशी आमच्या पक्षाची मागणी आहे. कारगील युद्धानंतर तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 'कारगिल आढावा समिती' स्थापन केली होती त्या धर्तीवर ही समिती असावी या मागणीचा खरगे यांनी पुनरुच्चार केला. भारतीय सैन्याचे धाडस आणि शौर्य याला आपला पक्ष सलाम करतो; पण सर्वंकष सामरिक आढावा ही काळाची गरज आहे, असे खरगे म्हणाले. संरक्षण दलप्रमुखांनी सिंगापूरमध्ये मुलाखतीत केलेल्या टिप्पण्यानंतर काही अतिशय महत्त्वाचे प्रश्न विचारणे आवश्यक झाले आहे.

संसदेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावण्यात आले तर तसे करता येईल; परंतु मोदी सरकार देशाची दिशाभूल करत आहे, असा खरगे यांनी आरोप केला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारत-पाकिस्तानदरम्यान शस्त्रविराम घडवल्याचा दावा वारंवार करत आहेत त्याबद्दल केंद्र सरकारने खुलासा करावा, अशी मागणीही काँग्रेसने केली. अमेरिकेच्या वाणिज्यमंत्र्यांनी न्यायालयात कथित हस्तक्षेपाबद्दल निवेदन दिले आहे. त्यावर मोदी यांनी देशाच्या हितसंबंधांपेक्षा व्यापाराला अधिक महत्त्व दिले का? असा प्रश्न काँग्रेसचे नेते रणदीप सुरजेवाला यांनी केला. मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चे वर्णन देशाच्या इतिहासातील सर्वांत मोठे आणि सर्वांत यशस्वी दहशतवादविरोधी मोहीम असे केले. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचे रक्त सांडले नाही तर आपल्या संस्कृतीवर हल्ला केला. त्यांनी आपल्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी भारताच्या महिला शक्तीला आव्हान दिले.

'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या दिवशी भारताच्या काही लढाऊ विमानांचे नुकसान झाले, असे संरक्षण दलप्रमुख अनिल चौहान यांनी सिंगापूरमधील मुलाखतीत मान्य केले मात्र त्यांनी त्याचा तपशील दिला नाही. किती विमानांचे नुकसान झाले त्यापेक्षा ते का झाले, हे शोधून काढणे अधिक महत्त्वाचे होते, असे ते म्हणाले. भारताची ६ विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा संपूर्णपणे चुकीचा असल्याचे त्यांनी सांगितले. विमानांचे नुकसान का झाले त्याचा शोध घेऊन आपल्या डावपेचामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार आम्ही डावपेचांमध्ये बदल केले आणि पाकिस्तानवर निर्णायक आघाडी प्रस्थापित केली, अशी माहिती सीडीएस चौहान यांनी दिली. भारतीय हवाई दलाचे डीजीएओ एअर मार्शल ए. के. भारती यांनी ११ मे रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत लढाऊ विमानांचे नुकसान झाले, अशी कबुली दिली होती मात्र हवाई दलाचे सर्व वैमानिक सुरक्षितपणे परत आल्याचे सांगितले होते. आम्ही केलेल्या डावपेचात्मक चुका समजून घेता आल्या, त्या दुरूस्त करता आल्या आणि पाकिस्तानातील धावपट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात हल्ले केले.

त्यांच्या सर्व हवाई संरक्षण यंत्रणा आम्ही भेदल्या आणि अचूकपणे हल्ले केले, असे जनरल अनिल चौहान यांनी सांगितले. सिंगापूरमधील ब्ल्यूमबर्ग टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत पाकविरुद्धच्या संघर्षात भारतीय विमाने पडली का? किती पडली? असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला स्पष्ट उत्तर देण्याचे सीडीएस चौहान यांनी टाळले होते. युद्ध म्हटले की नुकसान होतेच; परंतु ६ भारतीय विमाने पाडल्याचा पाकचा दावा पूर्णपणे चुकीचा आहे, असे सीडीएस म्हणाले होते तसेच भारत-पाक संघर्षात अण्वस्त्रांचा वापर करण्याचा मुद्दा चर्चेत नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले. पाकने सातत्याने विश्वासघात केल्याचा आरोप जनरल चौहान यांनी केला. वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी आणि आता सीडीएस यांच्या वक्तव्यामुळे पाकविरुद्धच्या संघर्षात भारतीय लढाऊ विमानांचे काही प्रमाणात नुकसान झाल्याच्या बातम्यांना बळ मिळत आहे, एवढे मात्र खरे. पाकिस्तानविरुद्धच्या संघर्षात भारतीय लढाऊ विमानांचे नुकसान झाल्याचे सीडीएस चौहान यांनी अप्रत्यक्षपणे कबुल केले आहे मात्र त्यांनी ही कबुली विदेशात जाऊन का दिली? हा खरा प्रश्न आहे. भारतीय लढाऊ विमानांची हानी झाल्याची कबुली विदेशात दिल्याने त्यातील गांभीर्य अधिकच वाढले आहे.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय वायुदलाची ६ लढाऊ विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. तो दावा सीडीएस चौहान यांनी फेटाळला आहे मात्र भारतीय विमानांचे थोडे-फार नुकसान झाल्याची अप्रत्यक्ष कबुलीही दिली आहे; पण किती विमानांचे नुकसान झाले हे स्पष्टपणे सांगत का नाहीत? पाकविरुद्धच्या संघर्षात भारताचे किती नुकसान झाले ते संरक्षण खाते का जाहीर करत नाही? लष्करी संघर्षादरम्यान झालेले नुकसान जाहीर करत नसल्यामुळे पाकिस्तान आपल्या शौर्याची टिमकी वाजवत आहे. पाकिस्तानचा दावा खोडून काढायचा असेल तर युद्धात भारताचे खरे किती नुकसान झाले ते जाहीर करायलाच हवे. नाही तर विनाकारण गैरसमज निर्माण होण्याला जागा मिळते, विरोधी पक्षही 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' असे म्हणू लागतात!



परळी – लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त गोपीनाथ गडावर भाजप नेते नवनाथ शिराळे यांनी दर्शन घेऊन विनम्र अभिवादन केले.

## एकाच कुटुंबातील तीन बालकाचा शेततळ्यात बुडून मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात जाफराबाद येथे एकाच कुटुंबातील तीन बालकांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झालाय. जाफ्राबाद तालुक्यातील वरुड गावातील एकाच कुटुंबातील तीन बालकांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, गावकरी हळहळ व्यक्त करत आहेत.**



ही तिन्हीही मुलं १४ वर्षीय यश जोशी, ९ वर्षीय दिपाली जोशी आणि ७ वर्षीय रोहण जोशी काल सकाळी घरातून महादेव मंदिरात दर्शनासाठी जातो, असे सांगून बाहेर पडले होते. मात्र संध्याकाळपर्यंत ते घरी न परतल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी आणि गावकऱ्यांनी शोध सुरू केला. रात्री उशिरापर्यंत व शोधाशोध सुरू असतानाच आज सकाळी शेतशिवारातील एका शेततळ्यात मुलांचे मृतदेह आढळून आले. या धक्कादायक प्रकारामुळे जोशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तीनही बालकांच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सदर ही घटनेचा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून यानंतर तिने बालकावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्घटनेचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झाल्या नसल्याचे समजते मात्र प्राथमिक माहितीनुसार मुलं खेळता खेळता पाण्यात गेल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. परंतु सदरील अशी घटना परत होऊ नाही यासाठी शेततळ्यांना कुलूप लॉक बंद करण्यात यावे असे मागणी काही नागरिकाकडून करण्यात येत आहे.

## पाटोदा तालुका बनला भुरट्या चोरांचा अड्डा!

### दररोज एक चोरी पोलीस प्रशासन केवळ हतबल

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुका सध्या भुरट्या चोरट्यांच्या विळख्यात अडकला असून, दररोज होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

लोकांची झोप उडाली असून, चोरट्यांच्या धाडसी कारवायांमुळे पाटोदा 'चोरांचा अड्डा' बनतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे! गेल्या काही दिवसांपासून शहरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये भुरट्या चोऱ्यांचं सत्र सुरू आहे.मोबाईल, दुचाकी, दुकानातील रोकड, शेती साहित्य चोरी यामध्ये झपाट्याने वाढ होत असून, आश्चर्य म्हणजे पोलिसांच्या हाती अजूनपर्यंत एकाही चोरट्याचा ठोस सुगावा लागलेला नाही! जनतेचा संताप उसळला! ''रोज सकाळी कुठे तरी चोरीची घटना झाली असते. पोलिसांचं काम फक्त एफआयआर लिहिणं आणि 'तपास सुरू आहे' सांगणं इतकंच उरलंय का?'' असा थेट सवाल पाटोदा शहरातील नागरिकांनी केला आहे. तालुक्यातील दिवसाढवळ्या सुरू असलेल्या चोऱ्यांवर कुठलाही राजकीय नेता उघडपणे बोलताना दिसत नाही. जनतेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाही नेत्यांचं मौन अनेक प्रश्न निर्माण करत आहे. नागरिकांची एकमुखी मागणी गावोगावी सीसीटीव्ही अनिवार्य करा चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाऊ पाटोदा तालुक्यातील पोलीस यंत्रणा सक्रिय करा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे

## पंकजाताई मुंडेंना उमाताई समशेट्टे परिवाराची अनोखी भेट

### लोकनेत्याच्या स्मृतिदिनी दिली गोमाता ; गोपीनाथ गड करणार गोमातेचा सांभाळ

**परळी वै.। प्रतिनिधी**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा अकरावा स्मृतिदिन आज विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला. या निमित्ताने गोपीनाथ गडावर अनेक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगानेच आज गोपीनाथ गडावर गोमातेची अनोखी भेट भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टी यांनी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना दिली. या गोमातेचा सांभाळ करण्याची जबाबदारी गोपीनाथ गडाने घेतली आहे.**



दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्याशी प्रत्येक कार्यकर्ता व व्यक्तीपरत्वे भावना जोडलेल्या आहेत. गोपीनाथ गड हे समर्थक व मुंडे प्रेमींसाठी एक देवालयच बनलेले आहे. गोपीनाथ गडावर तीन शक्तीपिठांचे एकत्र मंदिरही आहे. याठिकाणी गोमाता असावी या भावनेपोटी समशेट्टी परिवाराने यांनी एक गोंडस गोमाता (कालवड) गोपीनाथगडाला भेट देण्याचा निर्णय घेतला. उमाताई समशेट्टी यांनी ही गोमाता ना.पंकजाताई मुंडे यांना सुपूर्द केली. यावेळी नितीन समशेट्टी, आश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, अनिश अग्रवाल, राहूल घोबाळे आदी उपस्थित होते. आता या गोमातेचा गोपीनाथ गडावर सांभाळ केला जाणार आहे. गोपीनाथ गडाच्या पालक व राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे या अर्थाने गोमाता भेट ही अनोखी भेट ठरली आहे.

## जालन्यात पिकअप चोरी करणारी टोळी पकडली; चार आरोपी अटक

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरांमध्ये अशोक लेलेड कंपनीची दोस्त एलई लोडींग गाडी क्र. १३९४०९ व त्यामधील पार्सल माल असा मुददेमाल चोरी गेला होता या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सुचना दिल्याने त्या अनुशंगाने श्री पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, यांनी एक पथक तयार करुन पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना देवुन मार्गदर्शन केले. सदर गुन्हयाबाबत माहिती मिळवित असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सराईत आरोपी शेख आरेफ शेख साबेर, रा. तोतला पेट्रोलपंप शेजारी, भोकरदन नाका, जालना याने व त्याच्या साथीदारांनी सदरचा गुन्हा केला आहे. त्यानुषंगाने शेख आरेफ शेख साबेर याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी करीत असतांना फुलंब्री येथे गुन्हयातील अशोक लेलैंड कंपनीची दोस्त पिकअप मिळुन आले असल्याबाबत फुलंब्रीचे पोलीस अंमलदार श्री. पाचगे व श्री. कणसे यांनी कळविल्याने त्याठिकाणी पथक रवाना करुन पिकअप घेवुन जाणारे १) शेख फारुख शेख नब्बु, वय-३१ वर्ष, रा. वडोदबाजार, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर २) शेख समीर शेख रज्जाक, वय-२९ वर्ष, रा. वडोदबाजार, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवून सदरचा गुन्हा हा त्याचे जालना येथील साथीदार शेख आरेफ शेख साबेर, रा. तोतला पेट्रोलपंप शेजारी, भोकरदन नाका, जालना २) शेख अल्तमश शेख निसार, रा. तोतला पेट्रोलपंप शेजारी, भोकरदन नाका, जालना यांच्या मदतीने केला असल्याचे सांगितले. सदर आरोपीतांकडून गुन्हयातील चोरी गेलेला पिकअप जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपी हा सराईत चोर असुन त्याने अंबड पोलीस ठाणे हददीतील गु.र.क्र.४७५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. मधील आयशर चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. तसेच आरोपी नामे शेख समीर शेख रज्जाक, वय-२९ वर्ष, रा. वडोदबाजार, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर याने दिनांक २१/०३/२०२५ रोजी सिध्दी विनायक गणपती मंदीराजवळ, छत्रपती संभाजीनगर येथुन सुध्दा महेंद्रा बोलेरो पिकअप चोरी त्याने व त्याचे साथीदाराचे मदतीने केली असल्याची कबुली दिल्याने सदर गुन्हयाचा रिकॉर्ड सुध्दा चेक केला असता जवाहरनगर पोलीस ठाणे छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.क्र.१०७/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे.

## पान १ वरून...

### शेतकऱ्याचा कांदा

डोळ्यादेखत हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. परिणामी पावसामुळं बळीराजा पुन्हा हवालदिल झाला असून सध्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात अन्? रानात पाणीच पाणी बघायला मिळत आहे. उन्हाळी कोथिंबीर शेतकऱ्याला आर्थिक फायदा करून देणारी असते. मात्र गेली दहा ते अकरा दिवसापासून सुरू असलेल्या पावसाने बीडसह धाराशिव जिल्ह्यामध्ये कोथिंबीर उत्पादक शेतकऱ्याच्या उत्पादनावरती अक्षरशा: पाणी फिरवले आहे.

------------

### लोकनेत्यासाठी गोपीनाथगडावर

या कीर्तनानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तत्पूर्वी सकाळपासूनच गोपीनाथगडावर स्व. मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंडेप्रेमींनी रीघ लावली होती. त्याचबरोबर स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्ष रोपांचे वाटप, पशुसंवर्धन कॅम्प आदी उपक्रमही घेण्यात आले. या उपक्रमातही नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद घेतला. गोपीनाथ गडावर झालेल्या या कार्यक्रमाला व दर्शनाला राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कोणाची दृष्ट न लागो आपल्या या वैभवाला...**

यावेळी काहीशी भावुक भावना व्यक्त करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज अकरा वर्षे झाले माझे बाबा आणि आपले नेते आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांचे संस्कार आणि विचार पुढे घेऊन जाणे हे आपले कर्तव्य आहे. त्या विचारावर वाटचाल करताना वंचितांचा वाली आणि वाणी होण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला आहे. आजच्या या क्षणी सर्व भावंडे सर्व परिवार गोपीनाथगडावर एकत्र आहे. याचा मुंडे साहेबांनाही मोठा आनंद निश्चितच होत असणार. वैभव म्हणजे गाडी, संपत्ती, पैसा हे नाही तर लाखोंचा जनसमुदाय व त्यांचे हे प्रेम हे खऱ्या अर्थाने आमच्या परिवाराचे वैभव आहे. कितीही यातना भोगण्याची वेळ आली तरी त्या जनतेच्या प्रेमासाठी आम्ही यातना भोगायला तयार आहोत.मात्र या वैभवाला कोणाची दृष्ट लागू नये असे वाटते असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

**अकरा वर्षानंतरही ३ जून आली की वीज कोसळणाऱ्या त्या कटू आठवणी जाग्या होतात**

यावेळी अकरा वर्षांपूर्वीच्या आपल्यावर कोसळलेल्या दुःखाच्या आठवणी आपल्याला आजही वीज कोसळल्याचाच अनुभव करून देतात असे सांगताना पंकजाताई मुंडे यांनी तो दुःखद प्रसंग सांगितला.अकरा वर्षांपूर्वी मुंडे साहेब आमच्यातून गेले तेव्हा खूप मोठं संकट खूप मोठी वीज आमच्या डोक्यावर कोसळली होती. दोन जूनला रात्री मुंडे साहेबांना मी शेवटचे बोलले तेव्हा ते मला सांगत होते की मला हेलिकॉप्टर पाहिजे कारण मला सत्काराला जायचंय. सत्काराला परळीला जायची सगळी तयारी झाली होती.अचानक सकाळी सहाच्या सुमारास फोन आला की बाबांचा एक्सीडेंट झाला आणि नियतीने आपलं सर्वस्वच हिरावून नेलं असा प्रसंग कोणावरच येउ नये असे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

**स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने पुन्हा तसाच दुःखद प्रसंग**

गोपीनाथगडावरील कार्यक्रमातही स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाचे दुःख व्यक्त करत पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, मुंडे साहेबांच्या आपघाताच्या कटू आठवणीसारखाच पुन्हा तसाच दुःखद प्रसंग स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने आला.आर. टी. देशमुख जिजा यांचे निधन ही अतिशय दुःखद घटना झाली. आपण गोपीनाथ गडावर आवर्जून त्यांचा फोटो लावला. लेक म्हणून सूतकही पाळले. ना जात, ना पंथ ना धर्म परंतु असे असंख्य ऋणानुबंध मुंडे साहेबांनी निर्माण केलेले आहेत.मुंडे साहेबांचा हाच वारसा पुढे घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

----------

### स्व.मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला

व्यक्त करतांना बाळराजे पवार यांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणीना उजाळा देतांना ते म्हणाले की, २०१३ साली स्व.गोपीनाथ मुंडे यांनीच आमच्या कुटुंबाना गेवराईच्या राजकारणात सक्रिय केले. भारतीय जनता पक्षाकडुन माझे बंधू लक्ष्मण पवार यांना विधानसभेची उमेदवारी दिली. आशीर्वाद देऊन निवडून आणले. आमदार केले. आमच्या सारख्या राजकारणातून बाजुला गेलेल्या अनेक कुटुंबातील लोकांना स्व.गोपीनाथ मुंडेनी सत्तेत आणण्याचे काम केले आहे. आम्ही त्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा इमानदारीने प्रयत्न केला आहे. असे सांगून, बाळराजे पवार म्हणाले, स्व.गोपीनाथ मुंडे ही व्यक्ती नसुन एक विचार आहे. तोच विचार पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहुत, अशा भावना व्यक्त बाळराजे पवार यांनी स्व.गोपीनाथ मुंडेना अभिवादन केले आहे. यावेळेस संतोष हागे, प्रमोद मोटे,ईश्वर पवार, कृष्णा ढाकणे, लक्ष्मण मुंडे, प्रशांत राख, संतोष वनवे, विष्णुपंत आतकरे, बाळासाहेब उबाळे,श्रिराम घाटुळ,संतोष राठोड, प्रकाश गाडे,आदि उपस्थित होते.

----------------

### देशात कोरोना रुग्णांची

४४, केरळमध्ये ३५, महाराष्ट्रात २१, गुजरातमध्ये १८ आणि कर्नाटकात १५ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेशबद्दल रविवारपासून येथे आठ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. राजस्थानमध्ये सात, मध्य प्रदेशात चार, बिहारमध्ये तीन आणि छत्तीसगडमध्ये एक रुग्ण आढळला आहे.

**कोरोना फोफावतोय, केंद्र सरकार सतर्क**

गेल्या काही दिवसांपासून कोरोनाने पुन्हा डोकं वर काढले आहे. राज्यातील विविध भागात कोरोनाचे रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे केंद्र सरकार आणि राज्य सरकार सतर्क झाले असून, केंद्र सरकारने कोरोनाबाबत राज्याला मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. याबाबत पत्र लिहिले आहे आणि राज्याच्या आरोग्य विभागाने पालिका प्रशासनाला या मार्गदर्शक सूचनाबाबत पत्र पाठवले आहे. आरोग्य यंत्रणा सज्ज ठेण्याचे निर्देश केंद्राने राज्य सरकारला दिले आहेत. तसेच नागरिकांसाठी केंद्रानं काही सूचना दिल्या आहेत. मास्क वापरा, गर्दीच्या ठिकाणी जाणं टाळा असे आवाहन करण्यात आले आहे.

------------

### सरकारी बाबूंना ई-मेल,

पाठविली जाणार आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. शिस्तभंगाच्या प्रकरणांचा निपटारा जलद होण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी दोषारोपपत्र किंवा चौकशी अहवाल अशी शिस्तभंगाशी संबंधित कागदपत्रे व्यक्तिशः किंवा टपालाने पाठवली जायची. मात्र, अनेकदा ही कागदपत्रे संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी होत्या. यामुळे आता सरकारने नवीन पद्धती अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे सरकारी बाबूंना शिस्तभंगाची नोटीस ही ईमेल आणि हॉटस्अपद्वारे दिली जाणार आहे.

------------

### वाल्मिक कराड मकोकातून

निकम म्हणाले की, वाल्मिक कराड याने आपल्याला मकोकामधून दोषमुक्त करावे अशी मागणी करणारा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्या अर्जाची चौकशी १७ तारखेला होईल. वाल्मीक कराडने न्यायालयात वकिलांच्या मार्फत उत्तर दिलेले आहेत. आम्ही कोर्टाला असे प्रस्तावित केले आहे की याबाबतचा निर्णय एकत्रित सुनावणीत घेण्यात यावा. यावर न्यायालयाने आणि बचाव पक्षाच्या वकिलांची हरकत असल्याने बचाव पक्षाकडून असे सांगण्यात आले की प्रथम त्याला मकोकामधून मुक्त करावे. या अर्जावर चौकशी व्हावी, त्याला आम्ही हरकत नाही असे म्हटले. त्यामुळे आता वाल्मीक कराडला मकोकाच्या तरतुदी लागू होतात की नाही यावर १७ तारखेनंतर युक्तिवाद होतील, असे निकम यांनी सांगितले आहे. तर १७ तारखेला जे काही अर्ज न्यायालयात प्रलंबित होते त्यावर युक्तिवाद आणि न्यायालयाकडून निर्णय येईल. १७ तारीख ही अर्जाच्या चौकशीसाठी असल्याने मी त्या तारखेला उपस्थित राहणार नाही. परंतु ज्या-ज्या वेळेला महत्त्वाच्या घडामोडी असतील त्यावेळेला मी निश्चित न्यायालयात हजर असणार आहे. आणि तसेच माझे सहकारी ॲड. कोल्हे सरकारतर्फे १७ तारखेला बाजू मांडतील, अशी माहिती उज्ज्वल निकम यांनी दिली. दरम्यान कराड यांच्या अर्जावर १७ जूनला सुनावणी होणार असून यावेळी ॲड उज्ज्वल निकम सुध्दा हजर असणार नाहीत. तसेच कराड यांच्या अर्जावर सरकारी पक्षातर्फे हरकत सुध्दा घेण्यात न आल्याने कराड हे मकोकातून सुटतात का? असा प्रश्न आता सामान्य नागरीकांना पडला आहे.

------------------------

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०४ जून २०२५



## जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांच्याकडे पदभार

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. आर. एम. राऊत यांचा चार्ज आता जिल्हा परिषदचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांच्याकडे देण्यात आला आहे. श्री राऊत यांना जिल्हा हिवताप अधिकारी या पदावरून एक चार्जर काढून त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयातील मूळ पदावर त्यांच्या जागेवर देण्यात आली आहे . असे असले तरी राऊत यांनी अद्याप पदभार सोडला नसल्याचे बोलल्या जात आहे. आरोग्य संघटनेच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवरून राऊत हिवताप जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या विरोधात तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार आपणास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि खुलासा अद्यापही सादर केलेला नाही. यावरून आपण वरिष्ठाच्या आदेशाचे पालन करत नसल्याबाबत निदर्शनास येत आहे. ही बाब महाराष्ट्र नागरी सेवेच्या नियमाचे उलंघन करणारी आहे. आपल्याकडे अतिरिक्त असलेला जिल्हा हिवताप अधिकारी पदाचा पदभार या आदेशान्वये कमी करण्यात येत आहे. तेव्हा आपण आपल्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी उपस्थित राहून आपले मूळ कामकाज पाहावे, असे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी २९ मे २०२५ रोजी दिले आहेत. आदेशाची प्रत सहसंचालक, आरोग्य सेवा, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना, उप संचालक आरोग्य सेवा छत्रपती संभाजीनगर, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) छत्रपती संभाजी नगर आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांना पाठविण्यात आली आहे.

# कापणी झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी भरपाई

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश, मंत्रिमंडळ बैठकीत पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाची सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे आज बैठक झाली. या बैठकीच्या सुरवातीला राज्यात झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वरील प्रमाणे सांगितले.

मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाव्दारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची सादरीकरणाव्दारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करीता तातडीने मदतीकरीता निधी द्यावा



अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजी नगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीकरिता केंद्र सरकार अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे एक जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात आल्या आहेत, असे श्रीमती सोनिया सेठी यांनी सांगितले.यावेळी वन मंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकास मंत्री निलेश राणे यांनी पावसामुळे सुकी मासळीचे नुकसान झाले आहे. त्यांनी मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. यावर मदत पुनर्वसन विभागाने यावर प्रस्ताव सादर करावा अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पावसामुळे रस्ते आणि छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. त्यांची दुरुस्ती केली जावी, असे सांगितले. ग्राम विकास विभागाकडून ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात अशी मागणी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या पंधरा दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पुल दुरुस्ती बाबत विचार केला जावा, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी उजनी धरणाच्या जलाशयात १४.५ टीएमसी पाणी साठा आहे. जायकवाडी धरणात २८ टीएमसी तर गोसीखुर्द धरणात ३.७२ टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील पाणी टंचाईच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत टँकरने पुरवठा करण्याच्या गावांच्या संख्येत दोनशेने तर टँकरच्या संख्येत ३३६ ने घट झाली आहे. छत्रपती संभाजी नगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे, असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी सांगितले.

## आदर्श ग्रामपंचायत टोकवाडी लोकसहभागात सर्वात आघाडी

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील परळी तालुक्यात असलेल्या टोकवाडी या ग्रामपंचायतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये लोक सहभागातून उत्कृष्ट असे नियोजन केले आहे. गावातील सर्व सांडपाणी तसेच घनकचऱ्याचे व्यवस्थापन झाल्याने ग्रामस्थ सध्या आपली ग्रामपंचायत ओडीएफ प्लस मॉडेल करून आनंदी झाले आहेत.**

परळी तालुक्यात असलेल्या टोकवाडी ग्रामपंचायतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम पूर्ण करून ग्रामपंचायत ओ डी एफ प्लस मॉडेल ग्रामसभेतून घोषित केले आहे. जवळपास १२६५ कुटुंबे असलेल्या या गावातील सर्व गल्ल्यांमधून उघड्यावर वाहणारे सांडपाणी तसेच साठलेले पाणी पसरलेले दुर्गंधी यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते या सांडपाण्याच्या व्यवस्थापन करण्याबाबत ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा ग्रामस्थांनी मागणी केली होती त्याप्रमाणे ग्रामपंचायतीने सदर प्रस्ताव पंचायत समिती परळी यांच्याकडे सादर करून सांडपाणी व्यवस्थापनाचे काम करण्याबाबतचे नियोजन केले. लोक सहभागातून हे काम केले तरच भविष्यकाळात टिकणारे आहेत हे गृहीत धरत सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत गावाचा आराखडा तयार केला. गावात काम करताना काही अडथळे आले परंतु हे काम सर्वांसाठी आहे यात कुणाचाही वैयक्तिक फायदा नाही ही बाब लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी ग्रामस्थांनी बैठका घेतल्याशिवाय ग्रामपंचायत परिसरात याबाबत जनजागृती केली त्यामुळे निर्माण झालेला अडथळा साहजिक आपोआप संपला व वेळेत ही कामे पूर्ण झाली.

वैयक्तिक शोषखड्डे तसेच सार्वजनिक

शोष खड्डा या माध्यमातून गावातील सर्व सांडपाणी हे एका ठिकाणी आणण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनाबाबत ग्रामपंचायती अंतर्गत घंटागाडी उपलब्ध झाली असून तसेच सार्वजनिक ठिकाणी कचराकुंडी यांची व्यवस्था ग्रामपंचायत यांनी केली आहे शिवाय वैयक्तिक प्रत्येक कुटुंबाला दोन कचराकुंड्या हिरव्या व निळ्या रंगाची ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिली आहे. तसेच एकेरी प्लास्टिक वापर कॅरीबॅग यावर बंदी व प्लास्टिक संकलन व प्रक्रिया केंद्राचे काम सुरू केले आहे. कचरा वर्गीकरण केंद्रात वर्गीकृत केलेला कचरा येत आहे त्यामुळे ग्रामपंचायतीचा कचरा व्यवस्थापनाचा खूप मोठा भार सर्व कुटुंबांनी मिळून एकत्रित हलका केला आहे. ग्रामस्थांना कचरा वर्गीकरणाबाबत सांगताना मोठी अडचण होत आहे तरी देखील वर्गीकृत कचरा आपल्यासाठी खूप महत्त्वाचा आहे वर्षानुवर्ष हे एका ठिकाणी पडलेला आहे त्यामुळे असा कचरा भविष्यात आपल्या पिढीसाठी अडचणीचा आहे ही बाब सर्वांना समजल्यामुळे लोकांनी प्रतिसाद दिला आहे.

## दिलखुलास कार्यक्रमात रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे प्रा.जी.डी.यादव यांची मुलाखत

**मुंबई । प्रतिनिधी**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित दिलखुलास कार्यक्रमात रासायनिक तंत्रज्ञान संस्था (आयसीटी) या संस्थेचे माजी कुलगुरू प्रा. जी. डी. यादव यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.**

दिलखुलास कार्यक्रमात ही मुलाखत बुधवार दि. ४, आणि गुरूवार दि. ५, जून २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे, ज्येष्ठ निवेदक प्रसाद मोकाशी यांनी ही मुलाखत घेतली आहे. रासायनिक तंत्रज्ञान संस्था म्हणजेच इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) ही मुंबईतील एक प्रतिष्ठित शैक्षणिक आणि संशोधन संस्था आहे. या संस्थेअंतर्गत रासायनिक अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि औषध निर्माणशास्त्रात विशेष कामकाज केले जात आहे. उद्योगांना नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादने विकसित करण्यासाठी या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना रासायनिक अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषध निर्माणशास्त्र आणि संबंधित क्षेत्रांमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. या संस्थेचे माजी कुलगुरू तसेच प्रा. जी. डी. यादव यांनी हरित रसायनशास्त्र व अभियांत्रिकी, उत्प्रेरक विज्ञान, रासायनिक अभियांत्रिकी, ऊर्जा अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी आणि स्वच्छ व हरित तंत्रज्ञानाच्या विकासात उल्लेखनीय कार्य केले आहे. याची दखल घेऊन त्यांना यावर्षी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेने भटनागर फेलोशिपने सन्मानित केले आहे. त्यांनी केलेले संशोधन तसेच त्यांचा प्रवास याबाबत दिलखुलास कार्यक्रमातून प्रा. यादव यांनी माहिती दिली आहे.

# सर्वांच्या प्रेमाने आणि स्नेहाने भारावून गेलो - राजेभाऊ फड

### साधेपणाने केला जन्मदिवस साजरा; विविध क्षेत्रातील अनेकांकडून शुभेच्छांचा वर्षाव

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी त्यांचा जन्मदिवस अत्यंत साधेपणाने साजरा करणार असल्याचे आवाहन सर्वांना केले होते. त्याप्रमाणे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात आलेल्या सर्वांच्या शुभेच्छा अत्यंत साधेपणाने स्वीकारल्या. मात्र विविध क्षेत्रातील शेकडो मान्यवरांनी आपल्याप्रती व्यक्त केलेले प्रेम, स्नेह आणि दिलेल्या शुभेच्छांनी मी अत्यंत भारावून गेलो असून आपल्या



माणसांच्या या ऋणातून कधीही उतराई होता येणार नाही अशा भावना त्यांनी प्रकट केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या जन्मदिनानिमित्त विविध क्षेत्रातील शेकडो मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, वैद्यकीय, प्रशासकीय आदींसह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच भ्रमणध्वनीवर शुभेच्छा व्यक्त केल्या. जन्मदिवस हा सर्वांना शुभेच्छा देण्याचा दिवस असतो, आपल्याप्रती असलेले प्रेम आपण स्वीकारले पाहिजे. मात्र परळीचे भूमिपुत्र तथा माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार स्व.आर.टी.जिजा देशमुख यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. जिजांसोबत अनेक वर्षांचे आपले स्नेहबंध होते. त्यांच्या अनेक आठवणी आजही जाग्या होतात. अशा दुःखद काळात जन्मदिवस साजरा करणे उचित होणारच नाही. त्याचबरोबर बीड जिल्ह्याचे वैभव तथा महाराष्ट्राचे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचा पुण्यस्मरण दिन याच तारखेला असल्याने राजेभाऊ फड यांनी गोपीनाथगड येथे जाऊन लोकनेत्याला अभिवादन केले. मात्र सर्वांच्या शुभेच्छा त्यांनी प्रत्यक्ष भेटून स्वीकारल्या.

महादेव जानकर यांच्याकडून विशेष शुभेच्छा!

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष राज्याचे माजी मंत्री महादेव जानकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन राजेभाऊ फड यांचा जन्मदिवस साजरा केला. त्यांच्या उपस्थितीत सर्वांनी केक कापून अभिष्टचिंतन केले तर रामरक्षा गोशाळा येथे चारा देण्यात आला. तब्बल चार ते पाच तास थांबून महादेव जानकर यांनी राजेभाऊ फड यांचा जन्मदिवस उत्साहात साजरा केला. आगामी काळात राजेभाऊ फड यांच्यासाठी मोठे राजकीय भवितव्य असून त्यांना माझ्याकडून आवश्यक असेल अशी सर्व मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## सुलेमान देवळा येथे श्री गणेश डोअर अन् फेटेवाले यांच्या शॉप यांचे शुभारंभ सोहळा उत्साहात संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यामध्ये लग्न समारंभ विविध कार्यक्रम मध्ये फेटा बांधण्यासाठी प्रसिद्ध असलेले गणेश घोडके यांच्या श्री गणेश या दुकानाचा भव्य उद्घाटन सोहळा सुलेमान देवळा जून २०२५ रोजी सकाळी साडेनऊ वाजता संपन्न झाला यावेळी परिसरातील



विविध मान्यवरांनी उपस्थिती होती. याबाबत माहिती अशी की सुलेमान देवळा हे गाव खेड्यापाड्यातील गावांसाठी बाजारपेठेचे गाव आहे. या ठिकाणी शनिवारी भाजीपाला व इतर वस्तूंच्या बाजारभाव भरतो. उंदरखेल म्हसोबाचीवाडी हिवरा अंभोरा सालेवडगाव या गावातील ग्राहक खरेदीसाठी या ठिकाणी जात असतात. ग्राहकांच्या सोयीसाठी श्री गणेश या नवीन दुकानांमध्ये वॉटरप्रूफ लॅमिनेशन फायबर पीव्हीसी डब्ल्यूपीसी लॅमिनेट

एफ आर पी दरवाजे आकर्षक डिझाईन मध्ये हे करून मिळणार आहेत तसेच चौकट हार्डवेअर मटेरियल होलसेल दरात या ठिकाणी ग्राहकांना मिळणार आहे. तसेच फ्रिज व इतर लग्न समारंभात लागणाऱ्या वस्तू या दुकानांमध्ये उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांची सोय होणार आहे. त्याचप्रमाणे कपड्यांना ड्रायक्लीनर्स व इस्तरीची सोय या ठिकाणी करण्यात आली आहे. या उद्घाटन प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष येऊन या नाविन्यपूर्ण व्यवसायासाठी गणेश घोडके यांना शुभेच्छा दिल्या.

## डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी शासनाचा मोठा निर्णय; एस.एम.देशमुख यांच्याकडून सरकारच्या निर्णयाचे स्वागत

मुंबई । प्रतिनिधी

डिजिटल मीडियावर काम करणाऱ्या सर्वच डिजिटल पत्रकारांना शासन दरबारी हक्काच्या जाहिराती मिळाव्यात यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख,विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या मार्गदरणाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे व संपूर्ण डिजिटल मीडिया परिषद सातत्याने पाठपुरावा करत होती आज अखेर या संघटनात्मक पाठपुराव्याला यश आले असून राज्य सरकारने ३ जून २०२५ रोजी एक शासन निर्णय जाहीर करून डिजिटल मीडियावरील फेसबुक,युट्युब आणि इन्स्टाग्राम या माध्यमातून पत्रकारिता करणाऱ्या डिजिटल पत्रकारांना हक्काचा रोजगार देण्यासाठी शासकीय जाहिराती सुरू केल्या आहेत. गेल्या अनेक दिवसापासून मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मीडिया परिषद यासाठी सातत्याने विविध मंत्र्यांना भेटून डिजिटल मीडियाबद्दलची सखोल माहिती देत होते आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून कशा पद्धतीने



शासनाच्या जाहिराती लोकप्रिय होतील याबद्दल सांगत होते. अखेर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वच मंत्र्यांनी एकमत दाखवत डिजिटल माध्यमांना जाहिराती सुरू करण्याचा एक मोठा निर्णय घेतला आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषदेकडुन स्वागत करण्यात आले असून

डिजिटल मिडिया मध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळावी यासाठी सुध्दा मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषद सरकारकडे पाठपुरावा करीत असल्याचे मत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी स्पष्ट केले.

पान ६ वरून...

### महावितरणच्या चुकीमुळे

अशा सूचना धनंजय मुंडे यांनी अभियंताची राठोड यांना केल्या.

परळी शहरात काही ठिकाणी कॉंक्रीट रस्त्याच्या मध्ये ट्रांसफार्मर आलेले आहेत त्यांचे शिफ्टिंग करण्यासह महावितरणच्या विविध अपग्रेडेशनच्या एकूण १५ कोटी रुपयांच्या विकास कामांचा प्रस्ताव देखील तातडीने पूर्ण करून तो प्रस्ताव देखील शासनाला पाठवावा अशाही सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी केल्या. मलिक पुरा भागातील आधार खान हे होतकरू तसेच धनंजय मुंडे यांचे सहकारी होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी ही पुढाकार घेतल्याने अझहर खान यांच्या कुटुंबीयांना दिलासा व आधार मिळाला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, डॉ. संतोष मुंडे, राजेंद्र सोनी, सय्यद सिराज, शेख एजाज, श्रीकांत फड यांच्या सह स्थानिक पदाधिकारी व कुटुंबीय उपस्थित होते.

### गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या

खुलाशात म्हटले आहे. हा विषय अत्यंत संवेदनशील विषय असून याचे गांभीर्य लक्षात घेऊन गेल्या दोन वर्षांपूर्वी याबाबत शस्त्रक्रिया कशा पद्धतीने होतील याची कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आली आहे. यासंदर्भात अधिकृतपणे कोणतीही माहिती न घेता कोणी वृत्त देत असेल तर त्यास प्रसिद्धी देऊ नये असे आवाहन देखील याद्वारे करण्यात येत आहे.

### खेळाडू खेळामुळे होतो

चॅम्पियन ट्रॉफी लीगल ईगल क्रिकेट क्लब या संघांना देण्यात आली. अजिंक्य क्रिकेट क्लबचे कर्णधार पियुष गुळभिले तर लिगल ईगल संघाचे कर्णधार ॲड.अजित लोमटे यांनी संघाच्या वतीने हे पारितोषक स्विकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन उफाडे व सूत्रसंचालन अनंत कांबळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ॲड.बिंबीसार वाघमारे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा.अनंत कांबळे, शुभम चौधरी, साकेब पटेल, कुणाल लोमटे, बाळासाहेब गोरे, सचिन गुळभिले, भीमाशंकर शिंदे, समरजित देशमुख, विजय उपाडे, धम्मानंद वैद्य, बुद्धभूषण भडके, पियुष गुळभिले, प्रीतम मांदळे, संघर्ष इंगळे, धम्मपाल जाधव, अद्वैत देशपांडे, ऋषी माने, विक्रमसेन आगळे, सचिन उपाडे, विश्वजीत हंडीबाग, चेतन रोमन, चेतन माने, ॲड बिंबीसार वाघमारे, ॲड.सौरभ चौधरी, निलेश देशमुख, ज्योतीराम परळकर, अजय वडचकर, आनंद मुसळे, अशोक खाडे, राज शिंदे, ऋषी काटुळे, पवन खरात, मुन्ना गडदे, नरेश चव्हाण, जगन्नाथ पाटुळे, महादेव शेप, अमोल गोचडे, ॲड.पृथ्वीराज कदम, ॲड.राजकुमार चौरे, ॲड.अक्षय कामळे, खुशाल परदेशी, नितीन मुंडे, सचिन मुंडे, निहाल शेख, ऋषिकेश कदम यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

# शिक्षक, प्राचार्य ते कार्यकर्ते म्हणून डॉ.किशन पवार यांचा नावलौकिक - प्रा.सतिशराव पत्की

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**लोकमान्य टिळक महाविद्यालय, वडवणी (जि.बीड) चे प्राचार्य डॉ.किशन मनोहर पवार हे नियत वयोमानानुसार शनिवार, दिनांक ३१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्या निमित्त अंबाजोगाईत भव्य सेवानिवृत्ती गौरव सोहळा तसेच प्राचार्य किशन पवार लिखित बंजारा संस्कृति का समग्र इतिहास या ग्रंथाचे प्रकाशन आणि पवार यांचे वडील मनोहर रामा पवार यांचा सहर्षचंद्र दर्शन व तुलाई कार्यक्रम रविवार रोजी आयोजित करण्यात आला होता.**

आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात रविवार, दिनांक १ जून रोजी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे माजी कार्यवाह प्रा.सतिशराव पत्की, प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव, दिगंबर राठोड आणि गौरवमूर्ती प्राचार्य डॉ.किशन पवार यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी ॲड.लक्ष्मण कदम, प्राचार्य डॉ.हरिदास फेरे, डॉ.ऋषिकेश पवार, डॉ.सुभाष पवार, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, दिगंबर राठोड, अमरनाथ खुर्पे, गौरव समिती अध्यक्ष डॉ.प्रकाश जाधव, सचिव उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, हर्षवर्धन पवार आदींनी आपल्या मनोगतातून विविध संदर्भ, दाखले देत व स्वअनुभव कथन करून प्राचार्य डॉ.किशन पवार यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. याप्रसंगी बोलताना प्रा.सतिशराव पत्की यांनी सांगितले की, प्राचार्य डॉ.किशन पवार यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात प्राचार्य रा.गो.धाट, डॉ.शरदराव हेबाळकर आणि माझा मोलाचा वाटा आहे. पवार हे अभाविप, संघ परिवाराच्या विचाराचे पाईक आहेत. लोकमान्य टिळक महाविद्यालय, वडवणी (जि.बीड) चे नॅक मुल्यांकन करून घेण्यासाठी पवार यांनी मोठे परिश्रम घेतले आहे. अनेक आव्हाने स्वीकारून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. आपल्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्याचे आयोजन करून त्यांनी वडिलांचा सन्मान केला. शिक्षक, प्राचार्य ते कार्यकर्ते म्हणून




**वैयक्तिक व सामाजिक जीवनात डॉ.किशन पवार यांनी माणसं जोडली - नंदकिशोर मुंदडा**

**प्राचार्य डॉ.किशन पवार सेवापूर्ती गौरव, ग्रंथ प्रकाशन आणि सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा**

डॉ.किशन पवार यांचा सर्वदूर नांवलौकिक असल्याचे गौरवोद्गार प्रा.पत्की यांनी काढले. ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांनी डॉ.पवार यांच्याशी आपला मागील ३५ वर्षांपासूनचा स्नेहबंध आहे. पवार हे खोलेश्वर संस्कारात वाढले आहेत. वैयक्तिक व सामाजिक जीवनात डॉ.पवार यांनी माणसं जोडली, घडवली, जमवली आणि टिकवून ठेवली हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे असे श्री.मुंदडा म्हणाले. प्राचार्य डॉ.किशन पवार यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, मी ग्रामीण भागातील डोंगर दऱ्यातून इथपर्यंत आलो. माझ्या जडणघडणीत माझे चुलते सिताराम पवार, प्राचार्य रा.गो.धाट, डॉ.शरदराव हेबाळकर आणि प्रा.सतिशराव पत्की यांचा मोलाचा वाटा आहे. मी अत्यंत कष्टाने, मेहनतीने प्रसंगी मजुरी करून शिक्षण घेत राहिलो. माझा मुळ पिंड हा संघ परिवारात घडलेला आहे. मी आजपावेतो १२ ग्रंथ लिहिले, कारगिल शहिदांना आर्थिक मदत दिली. ३५ वेळा रक्तदान केले. यापुढील आयुष्यात समाजसेवा करणार आहे असे सांगून सत्कार सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना राजकिशोर मोदी म्हणाले की, प्राचार्य डॉ.किशन पवार हे माझे जिवलग मित्र आहेत. ते सामान्य कुटुंबातून पुढे आले. शिक्षण व अनुभवाच्या बळावर प्राचार्य झाले. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांना घडविण्यात चुलते सिताराम पवार, प्राचार्य रा.गो.धाट, डॉ.शरदराव हेबाळकर आणि प्रा.सतिशराव पत्की यांचा मोलाचा वाटा आहे. प्राचार्य डॉ.पवार हे एक संघर्षयोध्दा आहेत असे मोदी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.सोळुंके यांनी करून उपस्थितांचे आभार प्रा.उध्दव चव्हाण यांनी मानले. यावेळी सभागृहात ॲड.शिवाजीराव कराड, बळीराम पवार (आएएस, माजी जिल्हाधिकारी), ॲड.किशोर गिरवलकर, अशोक राठोड, प्राचार्य रा.गो.धाट, प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे, प्राचार्य डॉ.ताराचंद होळंबे, प्राचार्य डॉ.अरूण दळवी, प्रा.शरदराव हेबाळकर, बंडू सूर्यवंशी, डॉ.नरेंद्र काळे, विजयकुमार कोपले, मुकूंद पाटील, प्रा.मजगिरे, मधुकर राठोड, संजय राठोड, डॉ.प्रमोद वडते, डॉ.प्रिया पवार, डॉ.प्रिती पवार, राजेश चव्हाण, धनराज राठोड, डॉ.शंकर पवार, डॉ.सुभाष राठोड, डॉ.विवेकानंद चव्हाण, श्रीनिवास जोशी, शंतनु जोशी, डॉ.दीपक देशमुख, विजय राठोड (नागपूर) आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवर व्यक्तींना भेट म्हणून भारतीय संविधानाच्या १०० प्रती देण्यात आल्या. प्राचार्य डॉ.किशन पवार सेवापूर्ती गौरव, ग्रंथ प्रकाशन आणि सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा यशस्वितेसाठी डॉ.प्रकाश जाधव (प्राचार्य तथा अध्यक्ष, गौ.सो.समिती.), प्रा.गौतम गायकवाड (उपप्राचार्य तथा सचिव, गौ.सो.समिती.), डॉ.सौ.प्रिया प्रमोद वडते (एम.डी.पुणे), डॉ.सौ.प्रीती राजेश चव्हाण (एम.डी.पुणे), ऋषिकेश किशन पवार, हर्षवर्धन किशन पवार, पत्रकार जगन सरवदे, गणपत जाधव, संजय जाधव आदींसह गौरव सोहळा समिती आणि पवार कुटुंबियांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# कांदा उत्पादकांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता

## १० टक्के निर्यात प्रोत्साहन अनुदान पुन्हा सुरु करण्याची मागणी

नाशिक: केंद्र सरकारच्या निर्णयाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा फटका बसणार असल्याची चिन्ह आहे. करण निर्यात प्रोत्साहन योजने अंतर्गत कांद्या निर्यात दारांना मिळणारी १.९ टक्के परताव्याची सवलत सरकारने बंद केली असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे निर्यातीला मिळणारे प्रोत्साहन कमी होऊन कांदाची मागणी कमी होण्याची शक्यताही शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. देशांतर्गत बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात कांदा पीक असल्यानं बाजार भाव कोसळत आहेत. त्यामुळे सरकारने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकाऱ्यांकडून केली जात आहे.



दरम्यान, मोदी सरकारच्या या निर्णयामुळे कांदा उत्पादकांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता असल्याने केंद्र सरकारने निर्यात प्रोत्साहन अनुदान रद्दचा निर्णय मागे घ्यावा. तसेच १०% निर्यात प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली आहे. तसेच ही मागणी मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन केले जाणार, असा इशारा ही दिघोळे यांनी दिला आहे.

त्यामुळे आगामी काळात कांदा प्रश्न अधिक चिघळतो की त्यावर सरकार कडून काही तोडगा निघतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

नाशिक जिल्ह्यात ६ मे पासून सातत्याने ३ आठवडे पाऊस झाला आहे. शेतकऱ्याचे यात मोठं नुकसान झाले आहे.

द्राक्षाची गर्भधारणा होणे अशक्य आहे. तसेच डाळींब बाबतीत तसेच आहे. पावसाने चाळीतील कांदा खराब झाला आहेच सोबतच शेतात असलेला कांदाही वाहून गेला आहे. भाजीपाल्याची ही तीच अवस्था असल्याची प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिली आहे.

कृषिमंत्री नाशिक जिल्ह्यातील असताना ही त्यांनी आपलं बेजबाबदार वक्तव्य करणे बंद केले नाही.

पंचनामा कसला करावा? असे प्रश्न ते विचारात आहेत, शेतकऱ्यांशी तुलना भिकारीशी केली जात आहे. अजित पवार म्हणतात मनातले बोलायचे नसतं, त्यामुळे अजित पवारांच्या मनात तेच आहे. असा टोला ही त्यांनी लगावला आहे.

टोमॅटो आणि कांद्याची आवक वाढली

नाशिकच्या पिंपळगाव बसवंतमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो आणि कांद्याची आवक येत असते. दरम्यान, वापाऱ्यांनी टोमॅटोची खरेदी करुन देखील पैसे दिले नसल्यानं शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव बसवंत या बाजार समितीच्या अंतर्गत व्यापाऱ्यांना टोमॅटोची खरेदी केली होती. मात्र, त्यांनी शेतकऱ्यांची तब्बल अडीच कोटी रुपयांची देणी थकवली आहेत. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, आंदोलन सुरु झाल्यावर व्यापारी काही निर्णय घेतात का हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

# सोयाबीन पेरणीसाठी अशी घ्या काळजी

## भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेच्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना



खरीप हंगामात सोयाबीनचे चांगले उत्पादन घेण्यासाठी भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेने शेतकऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. संस्थेने शेतकऱ्यांना उन्हाळ्यात ३ वर्षांतून एकदाच खोल नांगरणी करण्याचा आणि सेंद्रिय खतांचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. याशिवाय, संस्थेने शेतकऱ्यांना एकाच वेळी २ ते ३ सोयाबीनच्या वाणांची लागवड करण्याचा आणि योग्य अंतर राखून पेरणी करण्याचा सल्ला दिला आहे.

संस्थेच्या महत्वपूर्ण सूचना : शेतकऱ्यांनी सोयाबीन लागवडीसाठीची जमीन उन्हाळ्यात ३ वर्षांतून एकदाच खोल नांगरणी करावी. शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील माती क्रॉस पॅटर्नमध्ये नांगरून माती समतल करावी. तसेच पेरणीपूर्वी प्रति हेक्टरी ५ ते १० टन कुजलेले खत किंवा २.५ टन कोंबडी खत वापरावे. याशिवाय ५ वर्षांतून एकदा सब-सॉयलर मशिन वापरून जमिनीचा खोल थर फोडावा.

कशी कराल लागवड? : शेतकऱ्यांनी पेरणी दरम्यान शिफारस केलेले बियाणे रांगेत ४५ सेंटीमीटर आणि एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंत ५ ते १० सेंटीमीटर अंतर ठेऊन लागवड करावी. तर पेरणीसाठी साधारणपणे प्रति हेक्टर ६० ते ७५ किलो बियाणे वापरावे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांनी पेरणीसाठी एकाच वेळी २ ते ३ सोयाबीनच्या वाणांची लागवड करावी. असे आवाहनही सोयाबीन संशोधन संस्थेने केले आहे.

शेतकऱ्यांना कसा फायदा होणार : सोयाबीन संशोधन संस्थेच्या वरील सूचनांचे पालन केल्याने शेतकऱ्यांना सोयाबीनचे चांगले उत्पादन मिळू शकते. यामुळे मातीची सुपीकता वाढण्यास मदत होते. याशिवाय पाणी आणि खताचा वापर कार्यक्षमतेने होतो. उत्पादनात होणारा धोका कमी होतो. शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकते. भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, या सूचनांचे पालन करून सोयाबीनचे चांगले उत्पादन घेऊन देशातील तेलबिया उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे.

# या खरिपात सोयाबीनसाठी पाच वाणांची लागवड ठरेल फायदेशीर

खरीप हंगामासाठी शेतकरी सोयाबीन लागवडीच्या तयारीत व्यस्त आहेत. परंतु, चांगले उत्पादन घेण्यासाठी योग्य वाण निवडण्याबाबत तो संभ्रमात आहे. सोयाबीनच्या टॉप ५ वाणांबद्दल सध्या बरीच चर्चा होत आहे. यातून शेतीचे उत्पादन वाढवण्यास तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासही मदत होऊ शकते. खरीप हंगामापूर्वीच सोयाबीनच्या अनेक जाती बाजारात आल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत कोणता वाण चांगला आहे किंवा कोणता वाण वेळ, परिस्थिती, हवामान आणि जमीन यानुसार चांगले उत्पादन देईल हे ठरविणे अवघड असते. यासाठी काही वाणांची माहिती घेण्याची गरज आहे. ज्यातून उत्पादनात वाढ होईल.



२०३४ विविधता : पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी, आपण जेएस २०३४ पेरू शकता. या जातीच्या दाण्यांचा रंग पिवळा, फुलांचा रंग पांढरा आणि शेंगांचा आकार सपाट असतो. या जातीची पेरणी कमी पाऊस असतानाही करता येते. कमी पाऊस असलेल्या ठिकाणी शेतकरी या जातीची पेरणी करून चांगले उत्पादन घेऊ शकतात. सोयाबीन २०३४ जातीचे एक हेक्टरमध्ये सुमारे २४-२५ क्विंटल उत्पादन मिळते. हे पीक ८०-८५ दिवसात पक्व होते.

१४०७ विविधता : १४०७ ही सोयाबीनची नवीन विकसित केलेली जात आहे. आसाम, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगड आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये याची लागवड केली जाते. ही जात ३९ क्विंटल उत्पादन देते.

तसेच, ही जात गर्डल बीटल, लीफ मायनर, लीफ रोलर, स्टेम फ्लाय यांसारख्या प्रमुख कीटकांना प्रतिरोधक आहे. ही जात ईशान्य भारतातील पावसावर अवलंबून असलेल्या परिस्थितीसाठी योग्य आहे. ही जात १०४ दिवसांत तयार होते. त्यात पांढरी फुले, पिवळ्या बिया आणि काळी हिलम असते. याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण १९.८१ टक्के आहे.

२०६९ वाण : सोयाबीनची २०६९ जात ही लवकर पिकणारी जात आहे. या जातीच्या पेरणीसाठी एकरी ४० किलो बियाणे लागते. या जातीपासून एक हेक्टरमध्ये सुमारे २२-२६ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यास ८५ ते ८६ दिवस लागतात.

बीएस ६१२४ वाण : या जातीच्या पेरणीसाठी प्रति एकर ३५-४० किलो बियाणे आवश्यक आहे. उत्पादनाबाबत बोलायचे झाले तर एका हेक्टरमध्ये या जातीपासून सुमारे २० ते २५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यासाठी ९० ते ९५ दिवस लागतात. या जातीची फुले जांभळ्या रंगाची आणि पाने लांब असतात. तसेच याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण २१ टक्के आहे. १८१ विविधता : सोयाबीनच्या १८१ जातीची वाढ मर्यादित आहे. हे पिवळे मोज़ेक आणि टार्गेट लीफ स्पॉट रोगांना प्रतिरोधक आहे. भारतातील सपाट भागात या जातीची लागवड केली जाते. विशेषत: मध्य प्रदेशात, या जातीला परिपक्क होण्यासाठी ९३ दिवस लागतात आणि त्याचे सरासरी उत्पादन १६-१७ क्विंटल प्रति हेक्टर आहे.

# मेथी लागवड माहिती तंत्रज्ञान

दैनंदिन आहारामध्ये मेथी या पालेभाजीचा वापर तुम्ही केलाच असेल. मेथी पिक हे कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे पीक आहे. मेथी हे पालेभाज्यातील महाराष्ट्रातील लोकप्रिय पालेभाजी आहे. दैनंदिन आहारात मेथीचा वापर आपल्या शरीरासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे या पिकाला वर्षभर चांगली मागणी असते. या पिकाची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.



जमीनीची निवड : मेथी हे कमी कालावधीचे पीक आहे. त्यामुळे योग्य जमिनीची निवड आवश्यक आहे. मेथी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते काळी आणि पाण्याचा योग्य जमीन लागते. चुनखडीच्या तसेच पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत मेथी पीक चांगले येत नाही.

लागवडीचा हंगाम : मेथी या पिकाची लागवड वर्षभर करता येते. पावसाळ्यात, उन्हाळ्यात आणि थंडीच्या सुरुवातीलाही मेथी पिकाची लागवड करता येते आणि या काळात लागवड केलेल्या मेथीला बाजारभाव पण योग्य मिळतो. भाजीचा सतत पुरवठा होत राहावा यासाठी टप्प्या-टप्याने मेथी पिकाची लागवड करून वर्षभर मेथी पिकाची उपलब्धता करता येऊ शकते.

जमिनीची मशागत : लागवड करण्याआधी जमिनीची चांगली आडवी उभी नांगरट करून घ्यावी. नांगरणी नंतर रोटरच्या मदतीने जमीन भुसभुशीत करून घ्यावी.

लागवड अंतर : मेथी या पिकाची दोन प्रकारे लागवड करता येते.

मुख्य पीक म्हणून आणि आंतरपीक म्हणून. मुख्य पीक म्हणून लागवड करायची असल्यास तीन मिटर बाय दोन मीटर च्या सपाट वाफ्यामध्ये लागवड करतात. दोन ओळींमध्ये पंधरा ते वीस सेंटीमीटर चे अंतर ठेवून मेथीचे बी फेकून लागवड करतात. तसेच आंतरपीक म्हणून मेथी पिकाची लागवड करायची असल्यास मुख्य पिकातील मोकळ्या जागेत असणाऱ्या वीस ते तीन सेंटीमीटर जागेत लागवड करतात.

बियाणांचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया : मेथी पिकाच्या मुख्य पीक म्हणून एक हेक्टर लागवडीसाठी पंचवीस ते तीन किलो बियाणे लागते. तसेच आंतरपीक घेताना आवश्यकतेनुसार बियाण्यांचे प्रमाण घ्यावे. बियाणे पेरताना एकसारखे आणि पातळ सोडावे. बिजप्रक्रिया करताना बुरशीनाशक ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बियाण्यास चोळावे.

सुधारित जाती : फुले कस्तुरी : फुले कस्तुरी हे वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे संशोधित करण्यात आले आहे. या वाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे या वाणाला जास्त फुटवे असतात आणि जास्त उत्पादन क्षमता आहे. हे वाण मर आणि नागअलीळा प्रतिकूल वाण आहे. या मेथीची उगवण लागवड केल्यावर सात ते आठ दिवसात होते. कस्तुरी सिलेक्शन : कस्तुरी सिलेक्शन हे वाण भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली येथे संशोधित करण्यात आले आहे. हे वाण खायला चविष्ट असते. या वाणाची पाने गोलाकार आणि हिरवी असतात. या वाणाची रोपे लहान आणि नाजूक असल्याने या वाणाला बाजारात चांगली मागणी असते. या मेथीची उगवण लागवड केल्यावर तीन ते चार दिवसात होते.

आंतर मशागत : कमी कालावधीचे पीक असल्याने मेथी पिकामध्ये जास्त आंतरमशागतीची गरज नसते. तण व्यवस्थापन करणे आवश्यक असते. लागवडीनंतर पंधरा ते वीस दिवसाच्या नंतर खुरपणी करून घ्यावी. मेथी पिकामध्ये तण वाढू देऊ नये.

खते आणि फवारणी : मेथी पिकाला सुरुवातीला २० किलो नत्र आणि नंतर खुरपणी झाल्यानंतर २० किलो नत्र हेक्टरी या प्रमाणात द्यावे. यामुळे पिकाची वाढ जोमदार होते. तसेच पेरणीनंतर वीस ते पंचवीस दिवसांनी दहा लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया मिसळून त्याची फवारणी करावी .यामुळे उत्पादनात वाढ होते. मेथी या पिकावर जास्त रोगांचा पादुर्भाव होत नाही. या पिकावर प्रामुख्याने पाने खाणारी अळी (लीप मायनर) आणि मावा या किडींचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळतो. मावा किड काळ्या रंगाची असते. मावा कीड पानाच्या खालच्या भागावर आणि शेंड्यावरून मोठ्या प्रमाणात पानातील रस शोषून घेते. त्यामुळे रोपे खराब होऊन रोपांची प्रत खराब होते. पाने खाणारी ही पानावरील रस शोषून घेत वेडीवाकडी पुढे पुढे जाते. त्यामुळे पानावर पांढरया रंगाच्या वेड्यावाकड्या रेषा दिसतात आणि रोपाची प्रत खराब होते. किडीच्या नियंत्रणासाठी पीक लहान अवस्थेत असताना पिकावर निंबोळी अर्काची आणि डायमियोट ची फवारणी करावी.

पाणी व्यवस्थापन : मेथी पिकाला नियमित पाणी द्यावे . मेथी पिकाला पाण्याची जास्त आवश्यकता असते. मेथीचे चांगले उत्पन्न घेण्यासाठी आणि भाजीच्या दर्जेदार कॉलिटी साठी मेथी पिकाला चार ते पाच दिवसांनी पाणी द्यावे. मेथी पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. पिकाला पाण्याचा ताण पडल्यास पिकाची वाढ कमी होऊन उत्पादनावर परिणाम होतो. मेथी या पिकाचे योग्य नियोजन केले तर या पिकातून योग्य नफा मिळवता येतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्र सेवादल दिवस, हुतात्मा दिन, विश्व निष्पाप बालक व आक्रमणपीडित दिन

### महत्वाच्या घटना

१०३९ : हेन्री तिसरा पवित्र रोमन सम्राटपदी.
१६७४ : मराठा साम्राज्य राज्याभिषेकापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांची सुवर्णतुला झाली. ब्रिटिश वकिलातीच्या मते त्यांचे वजन सुमारे ७३ किलो भरले.
१७९२ : कॅप्टन जॉर्ज व्हॅनकूवरने प्युजेट साउंड हा अखात ग्रेट ब्रिटनच्या नावे जाहीर केला.
१७९४ : ब्रिटिश सैन्याने हैतीची राजधानी पोर्ट-औ-प्रिंस जिंकली.
१८०४ : आपल्या पत्नीच्या मृत्यूने व्यथित असलेल्या सार्डिनियाच्या राजा चार्ल्स इम्मॅन्युएल चौथ्याने पदत्याग केला. त्याचा भाऊ व्हिक्टर इम्मॅन्युएल राजेपदी.
१८६२ : अमेरिकन यादवी युद्ध दक्षिणेच्या सैन्याने फोर्ट पिलोतून पळ काढला. उत्तरेने मेम्फिस, टेनेसीवर चाल केली.
१८७६ : न्यू यॉर्कहून निघालेली ट्रान्सकॉंटिनेन्टल एक्सप्रेस ही रेल्वे गाडी ८३ तास ३९ मिनिटांच्या प्रवासानंतर सान फ्रांसिस्को येथे पोचली. अमेरिकेच्या दोन तीरांना जोडणारी ही रेल्वेची पहिली प्रवासी खेप होती.
१८७८ : ऑट्टोमन साम्राज्याने सायप्रस युनायटेड किंग्डमच्या हवाली केले.
१८९६ : हेन्री फोर्ड यांनी तयार केलेल्या पहिल्या मोटारीचे यशस्वी परीक्षण.
१९१२ : मॅसेच्युसेट्स कामगारांचा लघुत्तम पगार ठरवणारे पहिले अमेरिक राज्य झाले.
१९२० : ट्रायानॉनचा तह.
१९२८ : तैवानच्या राष्ट्राध्यक्ष झ्हॅंग झुओलिनची हत्या.
१९२९ : अमेरिकन उद्योगपती व ईस्टमेन कोडक कंपनीची संस्थापक जॉर्ज ईस्टमैन यांनी पहिल्या रंगीत चित्रपटाचा नमुना सादर केला.
१९३९ : ज्यूंचे शिरकाण युरोपमधून ९६३ ज्यूंना घेउन आलेल्या एस.एस. सेंट लुईस या बोटीला अमेरिकेने परवानगी नाकारली. यापूर्वी क्युबानेही हे प्रवासी स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे ही बोट युरोपला परतली. यातील अनेक प्रवासी नाझींच्या छळसत्रात मृत्यू पावले.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्य पॅरिसमध्ये घुसले.
१९४२ : दुसरे महायुद्ध-मिडवेची लढाई सुरू.
१९४३ : आर्जेन्टिनामध्ये लश्करी उठाव, रमोन कॅस्टियोची हकालपट्टी.
१९४४ : अमेरिकेच्या हंटर किलर प्रकारच्या पाणबुड्यांनी जर्मनीची यु-५०५ ही पाणबुडी पकडली.
१९४४ : दुसरे महायुद्ध दोस्त सैन्याने रोम जिंकले.
१९५९ : भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळविणारे पहिले भारतीय नागरिक सी राजगोपालचारी यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली.
१९६७ : ब्रिटिश मिडलॅंड विमान कंपनीचे विमान कोसळले. ७२ ठार.
१९७० : टोंगाला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७९ : घानामध्ये लश्करी उठाव.
१९८९ : आयातोल्ला रुहोल्लाह खोमेनीच्या मृत्यूनंतर आयातोल्ला अली खामेनेई इराणच्या नेतेपदी.
१९९३ : आय.एन. एस. म्हैसूर या युद्धविनाशिकेचे जलावतरण.
१९९४ : मजरुह सुलतानपुरी यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.
१९९४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटु ब्रायन लारा याने आठ डावात सात शतके ठोकून नवा विक्रम प्रस्थापित केला.
१९९७ : इन्सॅट-२डी या संपूर्ण भारतीय बनावटीच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण झाले.
१९९७ : नासाचे मार्स पाथफाइंडर प्रोब मंगळावर उतरले.
२००१ : नेपाळचा शेवटचा राजा ग्यानेंद्र राज्यपदावर.
२००८ : हरियाणा राज्य सरकारकडून २५ वर्षांखालील मुलींना कौटुंबिक पेन्शनचा लाभ जाहीर करण्यात आला.
२०१० : स्पेसएक्स फाल्कन ९ रॉकेट पहिले उड्डाण.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३८ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (तिसरा) यांचा जन्म. (मृत्यू: २९ जानेवारी १८२०)
१९०४ : भगत पूरण सिंग भारतीय प्रकाशक, पर्यावरणवादी आणि परोपकारी पद्मश्री (निधन: ५ ऑगस्ट १९९२)
१९१० : होव्हर्क्राफ्ट चे शोधक ख्रिस्तोफर कॉकेरेल्म यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९९९)
१९१५ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मालिबो केएटा यांचा जन्म. (मृत्यू: १६ मे १९७७)
१९१६ : रॉबर्ट एफ. फर्चगॉट अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक नोबेल पारितोषिक (निधन: १९ मे २००९)
१९३१ : साली भारतीय रंगहीन हिंदी चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध अभिनेत्या बिना राय यांचा जन्मदिन.
१९३६ : चित्रपट अभिनेत्री नूतन बहल यांचा जन्म. (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९९१)
१९४६ : एस. पी. बालसुब्रह्मण्यम चित्रपट पार्श्वगायक पद्म भूषण, पद्मश्री (निधन: २५ सप्टेंबर २०२०)
१९४७ : अशोक सराफ, लोकप्रिय मराठी अभिनेते.
१९७४ : भारतीय शेफ जॅकब सहाय्या कुमार अरुनी यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर २०१२)
१९७५ : अमेरिकन अभिनेत्री अँजेलिना जोली यांचा जन्म.
१९९० : जेत्सुन पेमा वांग्चुक, भूतानाची राणी.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : प्रख्यात महाराष्ट्रीयन मराठी भाषिक कवी व भाषांतरकार रावसाहेब गोविंद वासुदेव कानिटकर यांचे निधन.
१९४७ : धर्मानंद दामोदर कोसंबी, बौद्ध धर्माभ्यासक, पंडित. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९६२ : चार्ल्स विल्यम बीब (चित्रित), अमेरिकन निसर्गतज्ज्ञ.
१९९८ : डॉ. अश्विन दासगुप्ता, इतिहासतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ.
१९९८ : गोविंद वासुदेव कानिटकर, मराठी साहित्यिक.
२०१४ : अमेरिकन बेसबॉल खेळाडू, व्यवस्थापक आणि मेजर लीग बेसबॉल (एमएलबी) चे प्रशिक्षक डॉन झिम्मर यांचे निधन.
२०१५ : सकू सुप्रसिद्ध अमेरिकन विन्स्टन चषक मालिका कार रेस ड्रायव्हर जबे थॉमस यांचे निधन.
२०२० : बासु चटर्जी (भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक, जन्म: १० जानेवारी १९३०).

# बिंदुसरा धरणावर पर्यटकांची हुल्लडबाजी सुरुच

## जिल्हा प्रशासनाच्या सावधानता अन सुरक्षिततेच्या आवाहनाकडे दुर्लक्ष ;सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड शहराजवळील पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प १०० टक्के पुर्णतः भरलेले असुन धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहु लागले आहे या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असुन नागरीकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन करून सुद्धा पर्यटकांना याचे गांभीर्य नसुन त्याकडे दुर्लक्ष करत धरणाच्या भिंतीवर, सांडव्यावर, पायथ्याशी पर्यटक जमा होत असून पर्यटकांच्या हुल्लडबाजी व हलगर्जीपणामुळे अपघात घडुन जिवितहानी होऊ नये यासाठी प्रतिबंधकात्मक उपाययोजना म्हणून सुरक्षारक्षक तैनात करण्यात यावेत तसेच संभाव्य दुर्घटना घडल्यास संबधित विभागाच्या जबाबदार आधिका-यांवर प्रशासकीय करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी , आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, उपविभागीय अधिकारी बीड,तहसीलदार बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन यांना केली आहे.





जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाने सुचना करताना पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असुन अचानक पाण्याची पातळी वाढू शकते.त्यामुळे धरण परिसरात जाणे टाळावे, धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक असुन अपघाताची शक्यता असल्याने टाळावे तसेच पालकांनी मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि स्थानिक प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे. मात्र याकडे पर्यटक दुर्लक्ष करताना दिसुन येत आहे. दररोजच्या पावसाने पाणी पातळीत वाढ होत असून धोक्यात जीव घालुन पर्यटक लोखंडी पुलावरून धरणांच्या धरणाच्या भिंतीवर व पायथ्याशी पर्यटक सांडव्याच्या ठीकाणी जमा होत असुन सांडव्याच्या भिंतीवर चढतात फोटो काढतात त्यानिमित्ताने पाय घसरून अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.पाठीमागे दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी याच बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडुन ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर,कॅनाल रोड बीड यांचा मृत्यु झाला होता. बिंदुसरा धरणाच्या सांडव्याशेजारी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला ''सावधान प्रतिबंधक क्षेत्र ''असा फलक लावण्यात आला असून अपघात,दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही,कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड आदेशावरून असा फलक लावण्यात आला असून या तलावाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची संरक्षण व्यवस्था नसल्यामुळेच त्याठीकाणी अपघाताच्या घटना घडत असुन पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदारी झटकतात मात्र प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी नेमलेले सुरक्षारक्षक नेमकं काय काम करतात असा प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत.भविष्यात दुर्घटना घडल्यास संबधित जबाबदार आधिका-यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## थोडक्यात



### बाळकृष्ण गवळी यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय परिचर पदावर कार्यरत बाळकृष्ण त्रिंबक गवळी यांची नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याबद्दल ३१ मे रोजी त्यांचा सत्कार संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी बाळकृष्ण गवळी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांच्या प्रामाणिक सेवाकार्याबद्दल ऋण व्यक्त करत पुढील आयुष्यासाठी अभिष्टचिंतन व्यक्त केले. सत्कार प्रसंगी पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सोमनाथ लांडगे, कार्यालय अधीक्षक अशोक पवार, प्रा. अशोक दहिफळे, प्रा. अनंता साळुंके, प्रा. रवींद्र जोगदंड, प्रा. रुपेश कोकाटे यांच्यासह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांनी बाळकृष्ण गवळी यांना निरोप देत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### जिल्हा स्टेडियम येथे ६ जून रोजी आपदा मित्र प्रशिक्षणाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

राज्यातील २० जिल्हयात राबविण्यात आलेल्या या प्रशिक्षणाचे यश विचारात घेऊन जिल्हा क्रिडा स्टेडियम, बीड येथे दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ''आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम'' राबविण्यात येणार आहे.सदर प्रशिक्षणामध्ये सहभागी उमेदवारांना नैसर्गिक आपत्तीचा सामना कशाप्रकारे करावा? याबाबतचे प्रशिक्षण एनडीआरएफ चे कुशल तज्ज्ञ प्रशिक्षक यांच्यामार्फत जिल्हा क्रिडा स्टेडियम बीड येथे विनामुल्य देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षणा दरम्यान सहभागी उमेदवारांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविणा-या प्रशिक्षणार्थी यांना १२ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आपत्ती व्यवस्थापन किट व प्रमाणपत्र वाटप केले जाणार आहे. या प्रशिक्षाणामध्ये बीड मधील नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी कॅडेट, सामाजिक संस्था स्वयंसेवक, आशा, अंगणवाडीसेविका, होमगार्ड, पोलीस, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी सहभाग नोंदवावा असे, आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांनी केले आहे.

### बुद्धिबळात अग्रेसर वल्लभ सर्वात लहान खेळाडू

माजलगाव। प्रतिनिधी



तालुक्यातील मोगरा गावचे मूळ रहिवासी असलेले अमोल बापूराव कुलकर्णी यांचा अवघ्या साडेचार वर्षाचा मुलगा चि. वल्लभ हा राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी महाराष्ट्राकडून खोरडा भुवनेश्वर ओरिसा येथील स्पर्धेत खेळत आहे . या यशाने मोगऱ्याचे नाव देशपातळीवर जात असल्याने वल्लभला सर्व क्रीडाप्रेमींनी आणि स्नेहीजनांनी आनंद व्यक्त करत शुभेच्छा दिल्या आहेत . ३८ व्या ७ राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी झाला आहे काल त्याने आंध्रप्रदेशच्या राहुल कलेरू या खेळाडू वर मात केली तर पुढील सामना चंदिगडच्या कीर्तीन धवन सोबत तो खेळणार आहे. ही स्पर्धा ५ जून पर्यंत सुरू असून नऊ फेऱ्या होणार आहेत. महाराष्ट्राकडून खेळणारा आणि सर्वात लहान वयाचा अवघ्या साडेचार वर्षाचा वल्लभ यापूर्वी देखील अनेक स्पर्धेत यशस्वी बुद्धिबळपटू म्हणून ठरलेला आहेच. सौ शुभांगी आणि अमोल हे कुटुंब बुद्धिबळ खेळात खेळाडू तयार होण्यासाठी मनःपूर्वक परिश्रम घेत असतात. नुकताच माजलगाव येथील उन्हाळी सुट्टीमध्ये प्रशिक्षण आणि स्पर्धेचे आयोजनही केले गेले होते . लहान वयात राष्ट्रीय स्तरावर मोगरा आणि बीड जिल्ह्याचा नावलौकिक करणारा बुद्धिबळ खेळाडू म्हणून वल्लभचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## युवा माहेश्वरी परळी वैजनाथचा दीपोत्सव सोहळा

### बीड़ जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन

परळी । प्रतिनिधीफ



युवा माहेश्वरी परळी वैजनाथ यांच्या वतीने महेश नवमी सप्ताह २०२५ च्या निमित्ताने आयोजित दीपोत्सव व सामूहिक महेश वंदना सोहळा सोमवार, दि. २ जून रोजी सायंकाळी वैद्यनाथ मंदिर परिसरात अत्यंत भव्य व दिव्य अशा वातावरणात उत्साहात पार पडला. या दीपोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे दीपप्रज्वलनाचे कार्य बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. नवनीत कावत यांच्या शुभहस्ते पार पडले. त्यांच्यासोबत परळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा. रघुनाथ नाचन हे देखील विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शहरातील विविध भागातून युवकांचा बुलेट रॅलीचा थाटात प्रारंभ झाला यानंतर दीपोत्सवाला सुरुवात झाली. उपस्थित सर्व भक्तांनी एकत्रितपणे प्रार्थना करून समाजहितासाठी व विश्वशांतीसाठी प्रार्थना केली. या दीपोत्सवात समस्त माहेश्वरी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. महिलांची सहभागिता, युवकांचा जोश आणि ज्येष्ठांचा मार्गदर्शनमूलक सहभाग या सर्वांमुळे हा कार्यक्रम अधिकच प्रभावी झाला. सर्व उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी, समाजबांधव आणि नागरिक यांनी युवा माहेश्वरी परळी वैजनाथच्या या आयोजनाचे भरभरून कौतुक केले.महेश नवमी सप्ताहात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबवले जात असून, परळी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या या दीपोत्सवाने जनमानसावर अमीट छाप पाडली आहे.

## शेतकऱ्यांचे अभ्यासवर्ग घेण्याच्या सूचना

बीड। प्रतिनिधी

पीकाचा स्तर उंचावण्यासाठी व शेतीतील पिकांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शेतक-यांचा अभ्यासवर्ग घेऊन त्यानां पेरणी आणि बियाणा संदर्भात योग्य मार्गदर्शन करावे, पावासाचा अंदाज घेऊन पेरणी करावी की नाही जेणे करुन शेतक-यांचे बियाणे वाया जाणार नाही अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मा अंतर्गत जिल्हा नियामक मंडळाच्या आयोजित बैठकीत दिल्या.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्ये जीवने, प्रकल्प उपसंचालक सुरज पाटील, महेंद्रा अण्ड महेंद्राचे व्यवस्थापक मंदार गडगे, कृषी भूषण दत्तात्रय जाधव विविध विभागाचे संबधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

राज्याच्या कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) आतंर्गत जिल्हा नियामक विषयाची माहिती व उर्वरित कामाबाबतच्या आराखडयाची माहिती पावरपॉईन्टव्दारे जिल्हाधिकारी यांना दर्शविण्यात आली आत्माचे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक यंत्रणा प्रकल्पाचे संचालक एस.एम साळवे यांनी प्रस्ताविक केले तर प्रकल्प उपसंचालक सुरज पाटील यांनी



आभार प्रदर्शन केले. कृषी विभागाकडून विविध विस्तार योजनेचा आढावा, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान कडणान्य, राष्ट्रीय अन्नसुरक्षा भियान- गहू, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- उस, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान-कापूस, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान-मका, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान भरडधान्य-मका, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान गळीतधान्य व तेलताड- सोयाबीन,भुइमुग,तीळ,जवस, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान पोष्टीक तृणधान्य-ज्वारी,बाजरी या राष्ट्रीय अन्न सूरक्षा आणि पोषण अभियान अन्नधान्य पिकाबाबत तसेच आभियानामध्ये सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्याक्षिके अंतर्गत मुलस्थानी जलसंधारण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, सुधारित व प्रमाणित बियाणे शेतकरी प्रशिक्षणे इत्यादीची माहितीही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पॉवरपॉइन्ट सादरीकरणाव्दारे जाणून घेतली.

## वडवणी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पोलीस उपनिरीक्षक यांना दिले निवेदन

वडवणी । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई डिजिटल मिडिया प्रदेश अध्यक्ष तथा दैनिक जनप्रवासचे संपादक सिध्दार्थ भैय्या भोकरे यांना बातमी दिल्याचा राग धरून उडवून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निषेधार्थ संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्या आदेशानुसार, प्रदेश अध्यक्ष गोविंदजी वाकडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी येथे काल दि.३ जुन मंगळवार रोजी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांना लेखी निवेदन देऊन जाहीर निषेध करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई डिजिटल मिडिया प्रदेश अध्यक्ष मा.सिद्धार्थ भोकरे यांनी दैनिक जनप्रवास या वृत्तपत्रातून असे म्हटले होते की, पाकिस्तान मधील क्रिकेट खेळाडू जसे पाकिस्तान प्रेम दाखवतात तसे प्रेम बॉलीवूडमधील खान बंधू अभिनेते आपल्या देशाबद्दल उघडपणे भारत प्रेम का दाखवत नाही? आपण देखील भारताच्या बाजूने खंबीरपणे उभे आहोत असे खान बंधूंनी देखील देशप्रेम दाखवायला हवं होतं, असे वृत्त प्रसिद्ध होताच काही अज्ञात इसमांनी निनावी पत्राद्वारे, तू आठ दिवसात माफी माग अन्यथा तुला गोळीबार करून उडवून देऊ अशी धमकी दिली आहे.या धमकीचा राज्य पत्रकार संघाच्यावतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात येत असून, राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सिद्धार्थ भोकरे यांना पोलिस संरक्षण देऊन तत्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी राज्य पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येत आहे. मा. मुख्यमंत्री यांनी या गुन्हेगारांना तातडीने अटक करण्याचे आदेश देवून कारवाई करावी नसता धरणे आंदोलन करण्याचा इशारा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा, वडवणी तालुका, डिजिटल मिडिया वडवणी तालुका, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका यांनी दिला आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा अध्यक्ष अँड विनायक जाधव , जेष्ठ मार्गदर्शक तथा तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे, शांतिनाथ जैन उपाध्यक्ष ,सतीशराव मुजमुले डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष,प्राध्यापक श्रीनिवास काकडे पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुकाध्यक्ष,अर्जुन मुंडे वडवणी तालुका सचिव, साप्ताहिक गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे , पत्रकार शंकर झाडे , पत्रकार गंगाभिष्म आंडील सर , संपादक अशोक फपाळ, पत्रकार अंकुश गवळी,पत्रकार शेख एजाज ,पत्रकार विष्णू डोईफोडे सर, पत्रकार शंकर जाधव , पत्रकार अंकुश पवार इत्यादी उपस्थित होते

## २७ वर्षानंतर भेटले वर्गमित्र



माजलगाव। प्रतिनिधी

नवविकास मंडळ माजलगाव संचलित माजलगाव येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मेळवा दिनांक १ जून रविवार रोजी आयोजित करण्यात आला होता.सन १९९७-१९९८ मध्ये दहावी झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी हा मेळावा आयोजित केला होता.तब्बल २७ वर्षांनी वर्गमित्र मैत्रिणी या मेळाव्यात बहुसंख्य प्रमाणात उपस्थित राहिले.सकाळी खरा तो एकचि धर्म ही प्रार्थना घेऊन सुरवात झाली, त्यानंतर सरस्वती पूजन,दीपप्रज्वलन झाले.उपस्थित सर्व शिक्षक,माजी शिक्षक यांना गुलाब पुष्प आणि ग्रंथ (पुस्तक) देऊन त्यांचे स्वागत/ सत्कार करण्यात आला.तसेच इतर मान्यवर यांना शेला, श्रीफळ आणि गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. नंतर विद्यार्थी परिचय आणि विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणी/ मनोगत व्यक्त केले.नंतर शिक्षकांनी मुलांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यालयातील माजी मुख्याध्यापक संतोष मुळी सर आणि गाजरे सर यांनीही मार्गदर्शन केले.पहिल्या सत्राची सांगता संस्थेचे कार्यवाह माजी आमदार डी के देशमुख आणि माजी अध्यक्ष अँड. एस.आर. शर्मा यांच्या हस्ते वृक्षारोपण आणि माजी विद्यार्थी यांच्या तर्फे विद्यालयातील ५ वी ते १० वी च्या एकूण १८ वर्गाना ग्रीन बोर्ड (फलक) भेट देऊन झाली. त्यानंतर स्नेह भोजन नंतर दुसरे सत्र विद्यार्थी कट्टा झाले आणि सायंकाळी चहापानाने सांगता झाली. यावेळी सर्वश्री माजी आ.देशमुख आणि माजी अध्यक्ष अँड. एस.आर.शर्मा, आर.बी देशमुख, शिरीष देशमुख, संतोष मुळी,के. व्हि.गाजरे,सुधीर देशमुख,संतोष जोशी, मोरेश्वर मसलेकर, ओमप्रकाश दायमा, रमेश गिरी, सुमंत गायकवाड,गणेश राठौर, हिमांशु देशमुख, शिवलकर, कदम,अरविंद वडकर, सोळंके, शिंगणे व अन्य शिक्षक उपस्थित होते.

## फळपिकांच्या बागांचे पुनरूज्जीवन करणे अळिंबी उत्पादन प्रकल्पासाठी शेतक-यांनी अर्ज करावेत

बीड। प्रतिनिधी

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२५-२६ अंतर्गत क्षेत्र विस्तार कार्यक्रम फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबु, पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच, अळिंबी उत्पादन प्रकल्प करिता शेतक-यांनी अर्ज करावेत असे आवाहन करण्यात येत आहे.एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबीउत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन हा घटक राबविण्यात येत आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबु, पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच, अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे या बाबींचा समावेश आहे. राज्यात व बीड जिल्ह्यात विदेशी फळे, फुले, मसाला या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविणे या दृष्टीने सदरचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या घटकांचे अनुदान खालीलप्रमाणेआहे.

घटक खर्च मर्यादा अनुदान मर्यादा फुले लागवड कट फ़्लॉवर्स (गुलाब, अॅस्टर, बर्ड ऑफ पैराडाईन, हेलिकोनियास, गोल्डन रोह, शेवंती इ.) १,२५,००० /प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोनह प्त्यात, कमाल रु. ५०,०००/- प्रति हेक्टर कंदवर्गीय फुले (निशिगंध,ग्लैडीओलस, लिलिन, लिलियम, कैलालिली, डेलिया इ.) रु.२,५०,००० / प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. १,००,०००/ सुटी फुले (झेंडू, अॅस्टर गॅलाडिया, हेलिक्रायसम, शेवंती, मोगरा, जाई, जुई,रु.५०,००० / प्रति हेक्टर एकूण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. २०,०००/ झिनिया, बिजली इ.). मसाला पिक लागवड बिया वर्गीय व कंद वर्गिय मसाला पिके (मिरची, हळद व आले)रु. ५०,०००/ प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. २०,०००/बहुवर्षिय मंसाला पिके (काळी मिरी, कोकम इ.) रु. १,००,०००/ प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. ४०,०००/ विदेशी फळपिक लागवड ड्रॅगनफुट रु.६,७५,०००/- प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. २,७०,०००/ स्ट्रॉबेरी रु.२,००,०००/- प्रति हेक्टर एकुण खर्चाच्यां ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. ८०,०००/अवैकेंडो. रु.१,२५,०००/- प्रति हेक्टर एकुण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल रु. ५०,०००/- प्रति हेक्टर जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन रु.६०,०००/ - प्रति हेक्टर खर्चाच्या ४० टक्के व जास्तीत-जास्त रू.२४,०००/- प्रति हे.अळिंबी उत्पादन प्रकल्प रु.३०,००,०००/-प्रति युनिटखर्चाच्या ४० टक्के व जास्तीत जास्त रू.१२,००,०००/- प्रति युनिट अळिंबी बीज उत्पादन केंद्र रु.२०,००,०००/- प्रति यूनिट खर्चाच्या ४० टक्के व जास्तीत जास्त रू.८,००,०००/- प्रति युनिट बटन अळिंबी उत्पादनासाठी कंपोस्ट प्रकल्प रु.३०,००,०००/- प्रति यूनिट खर्चाच्या ४० टक्के व जास्तीत-जास्त रू.१२,००,०००/- प्रति युनिट कमी खर्चाचे अळिंबी उत्पादन केंद्र रु.२,००,०००/- प्रत युनिट खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत-जास्त रू,००,०००/ - प्रति युनिट. तरी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, विदेशी फळे, फूले, मसाला लागवड व अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे तसेच, आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबू, पेरु, आवळा या फळपिकांच्या बागा असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल .. वर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जवळच्या तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा.

# स्वाराती रुग्णालयातील सीएमओचा मनमानी कारभार

## बर्दापूर पोलिसांच्या वारंवार विनंतीनंतरही वैद्यकीय प्रमाणपत्र नाकारलं ; तपास अधिकाऱ्याचे नांव ब्लॅकलिस्टमध्ये ?

अंबाजोगाई प्रतिनिधी

**अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हा क्र.१२५/२०२५ मध्ये जखमी झालेल्या व्यक्तीच्या तपासासाठी अत्यावश्यक असलेलं वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पोलिसांनी प्रयत्नांची शर्थ केली. मात्र स्वाराती रूग्णालय, अंबाजोगाई येथील मुख्य वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) व आरएमओ यांनी दोनवेळेच्या लेखी पत्रव्यवहारानंतर आणि प्रत्यक्ष भेटींनंतर ही अद्याप प्रमाणपत्र देण्यास नकारच दिला आहे. या टाळाटाळीमागे सत्ताधारी मानसिकता की मुद्दाम विलंब घडविण्याचा हेतू..? असा संशय आता उघडपणे व्यक्त केला जात आहे.**




जखमी नवीद खान मुजफ्फर खान पठाण (वय २३,रा.सायफाबाद) यांच्यावर दिनांक ५ मे २०२५ रोजी स्वाराती रूग्णालयात उपचार झाले होते. त्यावरून गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करत असलेले पोलिस शेख (तपास अधिकारी, बर्दापूर पोलीस ठाणे) यांनी २२ मे रोजी लेखी पत्र सादर केलं. त्यानंतर त्यांनी दोन वेळा प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि त्यासोबत फोनद्वारेही सीएमओ यांच्याशी सातत्याने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. या वारंवार संपर्काचा परिणाम असा झाला की, सीएमओ यांनी तपास अधिकारी शेख यांचं नाव 'ब्लॅक लिस्ट' मध्ये टाकल्याचं स्वतः सांगितलं आहे. ही गोष्ट केवळ धक्कादायक नाही, तर कायदा आणि न्यायप्रक्रियेची थेट अवहेलना आहे. एकीकडे पोलीस आपली जबाबदारी पार पाडत असताना, दुसरीकडे आरोग्य विभागाकडून असे उद्दाम आणि टोकाचे वागणे प्रशासनात असलेल्या विसंवादाकडे स्पष्टपणे बोट दाखवत आहे. या प्रकारामुळे पोलिसांची चौकशी प्रक्रिया थांबलेली असून, आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यास आवश्यक असलेले पुरावेही अडकलेले आहेत. सीएमओ आणि आरएमओ यांच्या या वागणुकीमुळे गुन्हेगारांना संरक्षण मिळतंय का?, असा संशय पोलिस वर्तुळासह स्थानिक नागरिकही व्यक्त करत आहेत. संपूर्ण अंबाजोगाई परिसरात या प्रकारामुळे संतापाचं वातावरण आहे. ''शप्रशासकीय अधिकारांचा गैरवापर करून पोलीस तपासात अडथळा आणणाऱ्या वर तत्काळ विभागीय चौकशी सुरू झाली पाहिजे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिसांची कामकाजात अडथळा आणणं हा कायद्याच्या दृष्टीने गंभीर गुन्हा असून, संबंधित अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे स्वतःचं 'ब्लॅक लिस्ट' बनवणं म्हणजे प्रशासकीय उद्दामपणाचं उदाहरण आहे. सध्या गुन्ह्याचा तपास अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर असताना वैद्यकीय पुरावे मुद्दाम थांबविले जात असल्याने, न्यायप्रक्रियेलाच सुरूंग लावण्याचा हा प्रयत्न असून, याची तातडीने दखल घेऊन कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

# जेष्ठ नागरिकांच्या विरंगुळा सभागृहासाठी भविष्यात निधी कमी पडु देणार नाही -आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

**तालुक्यातील जेष्ठ नागरिक संघ माजलगाव या संघटनेची बांधणी गेली अनेक वर्षांपासुन कै. अरूण शेजुळ यांनी केली. ही संघटना पाहता – पाहता मोठी झाली. या संघटनेच्या सभासदांना एकत्रित येण्यासाठी व विवीध कार्यक्रम घेण्यासाठी माजलगाव नपने जागा दिली तर आमदार प्रकाश सोळंकेंनी या जागेवर छोटेसे विरंगुळा बांधण्यासाठी पंधरा लक्ष रूपयांचा निधी दिला ते बांधकाम पुर्ण झाले. भविष्यात या विरंगुळा सभागृहाच्या विकासासाठी व जेष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी कमी पडणार नाही असे आश्वासन लोकार्पण सोहळ्यात आ. प्रकाश सोळंके यांनी दिले.**



जेष्ठ नागरिक संघ माजलगाव यांनी या लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थांनी डॉ. प्रकाश आनंदगांवकर हे तर प्राचार्य दामोधर थोरात, अच्युत लाटे, शरद यादव, उमेश मोगरेकर, पांडुरंग पवार, जी. बी. गदळे, शिवाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार प्रकाश सोळंके यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत या विरंगुळा केंद्राचे लोकार्पण व उद्घाटन झाले. प्रास्ताविकात संघाचे सचिव के. व्ही. गाजरे यांनी सांगीतले की, हा संघ मागील अनेक वर्षांपासुन माजलगावमध्ये कार्यरत आहे. कै. अरूण शेजुळ यांनी जेष्ठ नागरिकांची संघटना व्हावी या दृष्टीने बांधणी केली होती. त्याचे रूपांतर आता वटवृक्षात होत आहे. या संघात माजलगावातुन २५० सभासद असुन महिलांचाही मोठा सहभाग आहे. हा संघ जेष्ठ नागरिकांसाठी व समाजातील दुर्लक्षीत घटकांसाठी अनेक कार्यक्रम हाती घेत यशस्वी करतोय त्यामुळे जेष्ठ नागरिक संघासाठी एका कार्यालयाची खुप आवश्यकता होती हे सभागृह कार्यालय नसुन आम्हा जेष्ठ नागरिकांचे घर बनले आहे. त्यामुळे उपस्थितांच्या वतीने जेष्ठ नागरिकांच्या वतीने आ. सोळंके यांचे आभार मानले. यावेळी डॉ. प्रकाश आनंदगांवकर, दामोधर थोरात यांनी आपल्या भाषणात बीड जिल्ह्यात व मराठवाड्यात जेष्ठ नागरिकांच्या संघाची बांधणी ही माजलगावात खुप छान असुन ती कौतुकास्पद असल्याचे गौरवद्गार काढले. यावेळी अच्युत लाटे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास ॲड. सुलभा देशमुख, सुधाकर घुबडे, शामसुंदर दळवी, रमेश ठाकुर यांचेसह शेकडो सन्माननिय जेष्ठ नागरिक बंधु व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सुत्रसंचालन कोषाध्यक्ष जिवन पांचाळ यांनी केले तर आभार दत्तात्रय सोळंके यांनी मानले.

# आरती सोनेसांगवीकर यांची ब्राम्हणसभा अंबाजोगाई शहर दक्षिण विभाग महिला उपाध्यक्षपदी निवड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्त्या आरती मिलींद सोनेसांगवीकर यांची ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी ब्राम्हण सभेच्या अंबाजोगाई शहर दक्षिण विभागाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. आरती सोनेसांगवीकर ह्या सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उत्तम पद्धतीच्या भरीव कार्यातून सक्रिय आहेत. दुर्गप्रेमी मंडळाचे उपक्रम तसेच समाजसेवेच्या माध्यमातून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.



विश्व हिंदु परिषद प्रखंड प्रमुख अ.भा.पेशवा संघटना बीड जिल्हा अध्यक्ष अ.भा.ब्राह्मण महासंघ मराठवाडा सदस्य आदी संघटनेच्या पदावर कार्य केले असून त्या कार्याचा गौरवही झाला आहे. महिला दिनानिमित्याने त्यांना पुरस्कारही प्राप्त झाला आहे. अंबाजोगाई ब्राम्हण सभेचे कार्य अत्यंत मोठे असून मराठवाडा व त्या बाहेर या कार्याचा आदर्श व नावलौकिक आहे. समाजासाठीच्या अनेक उपक्रमात ब्राम्हण सभा अग्रेसर असते याच कार्यासाठी व समाजाच्या हितासाठी मी कटिबद्ध असून उपाध्यक्ष पदाला माझे कार्य साजेशे असेल माझी निवड केल्या बद्दल ब्राम्हण सभेचे धन्यवाद व्यक्त करते असे मत आरती सोनेसांगवीकर यांनी व्यक्त केले. आरती सोनेसांगवीकर यांच्या नेमणुकीच्या रूपाने ब्राम्हण सभेला दोन उपाध्यक्ष मिळाले असून हे कार्य अधिक गतीने वाढणार आहे आरती सोनेसांगवीकर यांच्या नेमणुकीबद्दल डॉ.कल्पना चौसाळकर, वैशाली विडेकर, कविता चौसाळकर,सुचिता देशपांडे,कल्याणी पत्की (देशपांडे),गायत्री संदीकर, कल्पना गोस्वामी,प्रा.पुनम पत्की (देशपांडे),उमा दिक्षित,अंजली सेलुकर, गौरी पुराणिक,मोक्षदा जोशी, कल्पना जवळगांवकर, उपासना कुर्डूकर,प्राची हिवरेकर, स्मिता दिक्षित, अनुजा देशपांडे, डॉ.गोपाळ चौसाळकर,अशोक कुलकर्णी,पंडीत विडेकर,प्रा.रवि जोशी, अरविंद महाजन आदीसह इतरांनी अभिनंदन केले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ग्रामसेवकांनी केली पैशाची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

सोनेगाव ग्रामपंचायत मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेत ग्रामसेवक माने एसडी. यांनी १५ वा वित्त आयोग याची कामे न करता पैसे उचलले तसेच ग्रामसेवकांनी प्रत्येक घरकुल लाभार्थी कडून प्रत्येकी १५ हजार रुपये घेतात त्यांनी दहा हजार रुपये नाही दिल्यास त्यांची पाहणी अहवालावर स्वाक्षरी करणार नाहीत असे त्यांना सांगण्यात येते तशी लेखी तक्रार सोनेगाव येथील ग्रामस्थ अशोक जगन्नाथ चौरे सुनील बबन चौरे यांनी पाटोदा पंचायत समिती यांच्याकडे केली आहे

घरकुल योजना दोन्ही गावची असून घरकुलाची अंदाजे एकूण १५ लक्ष रुपये गोळा केले आहेत असा आरोपही करण्यात आला आहे आहे तरी या अर्थी क घोटाळ्याची चौकशी करून ग्रामसेवकांना निलंबित करावे व दुसरा ग्रामसेवक देण्यात यावा अशी मागणी सुनील बबन चौरे व अशोक जगन्नाथ चौरे यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय पाटोदा यांना केली आहे.

# खेळाडू खेळामुळे होतो मानसिकदृष्ट्या कणखर – मानसोपचार तज्ज्ञ डॉ.इंगोले

## उज्ज्वोत प्रीमियर क्रिकेट लीग – २०२५ स्पर्धेचा शानदार समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**उज्ज्वोत क्रिकेट फाऊंडेशन व योगेश्वरी क्रिकेट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचा शानदार समारोप झाला. विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण नुकतेच योगेश्वरी कॉलेजच्या राजमाता जिजाऊ क्रीडांगणावर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य मारूती कानिटकर, क्रीडा शिक्षक रमण सोनवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.इंगोले यांनी कोणताही खेळ त्या खेळाडूला शारीरिकदृष्ट्या सक्षम तर बनवतोच शिवाय मानसिकदृष्ट्या कणखर बनवतो. खेळाडू हे आत्मविश्वासाने भरलेले असतात. त्यांच्यामध्ये खिलाडूवृत्ती सोबतच सहकार्य, प्रेम, एकसंघ राहण्याची वृत्ती आणि खेळाप्रती निष्ठा हे गुण आपोआप रूजले जातात त्यामुळे कोणताही खेळाडू हा जीवनामध्ये आपल्या ध्येयाच्या दिशेने जाण्यासाठी सक्षम असतो. खेळ हा त्या खेळाडूचा आत्मसन्मान असतो. सध्या विद्यार्थी मोबाईलवरच विविध खेळ खेळत असल्याने मैदानावर खेळाडूंची कमतरता भासत आहे. मोबाईलवरचे आभासी खेळ खेळल्याने शारीरिक व मानसिक कसरत होत नाही उलट मेंदूला विनाकारण ताण निर्माण होतो. खेळामुळे खेळाडूचे फक्त शारीरिक व मानसिक तंदुरूस्तीच नाही तर सामाजिकिकीकरणाची प्रक्रिया होत असल्याने खेळाडू हा समाजाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा हिस्सा असतो असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. प्राचार्य मारूती कानिटकर यांनी बोलतांना विद्यार्थ्यांनी विविध खेळ खेळले पाहिजेत आणि शारीरिक तंदुरूस्ती ठेवली पाहिजे असे प्रतिपादन केले. क्रीडा शिक्षक रमण सोनवलकर यांनी विद्यार्थ्यांनी शारीरिक कसरत असणारे खेळ खेळून शारीरिक तंदुरूस्ती वाढवली पाहिजे असे वक्तव्य केले. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक युवा नेते संकेत मोदी तर द्वितीय पारितोषिक सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या वतीने देण्यात आले होते. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रोख रक्कम रूपये तीस हजार व चॅम्पियन ट्रॉफी अजिंक्य क्रिकेट क्लब तर द्वितीय पारितोषक रोख रक्कम पंधरा हजार व

◀◀ पान ३ वर

# महावितरणच्या चुकीमुळे मृत्यू झाला असेल तर मदतीचा प्रस्ताव तात्काळ पाठवा – धनंजय मुंडे यांच्या सूचना अन् फैसला ऑन द स्पॉट

## सांत्वन पर भेटीसाठी आलेल्या धनंजय मुंडे यांनी अझहर खान यांच्या कुटुंबाला दिला आधार

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील मलिकपुरा भागातील होतकरू तरुण अजहर खान यांचा महावितरणच्या तारेचा करंट लागून झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. आज त्यांच्या कुटुंबाची सांत्वन पर भेट घ्यायला गेलेल्या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुन्हा एकदा '' फैसला ऑन द स्पॉट '' या कार्यपद्धतीचा या निमित्ताने पुन्हा एकदा परळी करांना प्रत्यय आला.

अजहर खान यांचा मृत्यू हा उघड्या पडलेल्या तारेचा करंट लागल्याने झाल्याचे समजताच, धनंजय मुंडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी महावितरणचे अभियंता श्री राठोड यांना बोलावून घेतले. त्यांच्याकडून वस्तुस्थिती समजून घेत महावितरण कडून जर तार उघडे राहिली असेल तर ती महावितरणची चूक असल्याने महावितरणच्या माध्यमातून अजहर खान यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी यासाठीचा प्रस्ताव तात्काळ शासनाला पाठवा

◀◀ पान ३ वर



# गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या ऊसतोड कामगार महिलांची संख्या चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ८४३ महिलांची गर्भपिशवी काढली यात तीस ते पस्तीस वयोगटातील ४७७ महिला असल्याची बातमी काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली आहे ही बातमी चुकीच्या माहितीवर आधारित असून याबाबत वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे. सन २०२४ मध्ये एक जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत संपूर्ण वर्षभरात बीड जिल्ह्यात शासकीय रुग्णालयांमध्ये ५२७ गर्भाशय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या एकूण ऊसतोड महिला कामगारांची संख्या केवळ ८ इतकी आहे.

याच एक वर्षाच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये ६५६ गर्भाशय शस्त्रक्रिया झाल्या तर २२ प्रकरणी शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या यातील एकूण ऊसतोड कामगार महिलांची संख्या ५५ इतकी आहे व या दोन्ही गटात वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोडीस जाणाऱ्या एकूण महिलांची संख्या ० इतकी आहे असा लेखी खुलासा बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी केला आहे.

चालू वर्षात १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत शासकीय रुग्णालयात झालेल्या गर्भाशय शस्त्रक्रियांची संख्या ९८ आहे यात ऊसतोड कामगार महिला किंवा वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोड कामगार महिला यांची संख्या देखील ० इतकी आहे.

याच पाच महिन्यांच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये २६८ शस्त्रक्रिया झाल्या तर सहा शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या, यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या ऊसतोड महिला कामगारांची संख्या ५२ इतकी आहे व त्यातील केवळ एक ऊसतोड कामगार महिला ३५ वर्षे वयाखालील असल्याचेही या लेखी

◀◀ पान ३ वर

# पाटोदा तालुक्यामध्ये एकही वीजरोधक यंत्रणा नाही

**पाटोदा । प्रतिनिधी**

विजेच्या धक्क्यापासून जीवित हानी टाळावी या उद्देशाने वीज रोधक यंत्रणा नसल्याचा फटका शेतकरी पशुपालकांना बसला असून मागील अवकाळी पावसात आकाशातून वीज पडून आठ जनावरे दगावली वीजरोधक यंत्रणा ढगांमधून येणाऱ्या विजेला स्वतःकडे आकर्षित करून सुरक्षितरीत्या जमिनीमध्ये उतरविते. त्यामुळे घर शाळा रुग्णालय शेती शेड शेतकरी जनावरांना यांचे प्राण व मालमत्तेचे मोठे नुकसान टाळले जाते. पाटोदा तालुक्यामध्ये बारा मे पासून अवकाळी पावसाने कर केला आहे यात शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले असून पशुधनाचा जीव गेला आहे यामुळे खरीप हंगामातील पेरणीच्या तोंडावर शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे अवकाळी पावसाच्या काळात तालुक्यातील एके वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या किरायाने राहत असलेल्या घरावरून मध्यंतरी वीज कोसळून छोटा खड्डा पडण्याची घटना पडली आहे या घटने सुदैवाने कोणतेही जीवित हानी झाली नाही प्रशासन सावधानतेचा इशारा ठरत आहे पर्जन्यमापक यंत्रणा आहे का यात संका निर्मन झाली आहे प्रशासनाने दिलेल्या मातीनुसार तालुक्यातील चार महसूल मंडळांमध्ये पाटोदा शहरात वीज पर्जन्यमापक यंत्रणा बसवण्यात आले आहेत मात्र ही यंत्रणा अचूक पर्जन्यमापन्न केल्यामुळे अनेकदा शेतीचे नुस्कान गायक ठरत आहे



### तालुक्यातील विज यंत्रणाचा उपयोग नेमका काय

**तालुक्यातील वीज रोदक केंद्रा नेमके कुठे बसवण्यात आली आहे याची माहिती प्रशासनातील अधिकाऱ्यांनी उपलब्ध नसलेल्या दिसून आले महसूल विभागातील एक अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता त्यांनी वरिष्ठ पातळीवरून आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून माहिती घेऊन कळू असे सांगितले त्यामुळे विजविरोधक यंत्रणा खरच बसवण्यात आले आहेत की नाही या शंकानिर्माण झाले आहे.**

# जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते विद्यार्थी अपघातग्रस्त सानुग्रह अनुदानाचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

**योजना शिक्षणाधिकारी विभागाच्या वतीने राजीव गांधी अपघात सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत एक लाख रुपयाचा धनादेश अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या शुभहस्ते व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आला.**



मंगळवार दिनांक ३ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष राजीव गांधी अपघात सानुग्रह अनुदान योजना, जिल्हा बीड यांच्या उपस्थितीत योजनेचा आढावा घेण्यात आला.बीड जिल्ह्यासाठी सन २०२४- २५ वर्षासाठी एकूण ९३ लाभार्थ्यांसाठी सानुग्रह अनुदान मान्य झाले आहे. या ९३ लाभार्थ्यासाठी १ कोटी ११ लक्ष १६ हजार ३७५ रुपये सानुग्रह अनुदान मंजूर झाले आहे. सदर निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर आरटीजीएस प्रणालीद्वारे जमा झाला आहे. प्राथमिक स्वरूपामध्ये या योजने अंतर्गत छत्रपती राजर्षी शाहु महाराज माध्यमिक विद्यालय, वडवणीचा अपघातग्रस्त ऋषिकेश मस्के या विद्यार्थ्यांच्या आईला नुकसान भरपाईचा एक लाख रुपयाचा धनादेश देण्यात आला. यावेळी धनादेश यमुना रामेश्वर मस्के यांनी स्वीकारला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे वडील रामेश्वर मस्के, शिक्षणाधिकारी (योजना) संजय पंचगल्ले, सहाय्यक योजना अधिकारी एम झेड खतीब उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# फलोत्पादन विकासासाठी देशात नऊ महाराष्ट्रात तीन प्रोजेक्ट उभारणार-शिवराजसिंह चौहानांची मोठी घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

फलोत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना कीडमुक्त व चांगली रोपे मिळावी, यासाठी देशात नऊ ठिकाणी क्लीन प्लांट प्रोजेक्ट सुरू करण्यात येणार आहेत. यापैकी महाराष्ट्रात तीन प्लांट राहणार असून, यातील एक प्लांट पुण्यामध्ये असेल. या ठिकाणी द्राक्षांची रोपे शेतकऱ्यांना मिळतील. अशी घोषणा केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली. महाराष्ट्र शासनाच्यावतीने आयोजित भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय कृषी हॅकाथॉनच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री डॉ. माणिकराव कोकाटे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आदी उपस्थित होते.

चौहान म्हणाले, हॉर्टिकल्चर मधून शेतकऱ्यांना सध्या जी रोपे मिळतात ती क्लीन आहेत का म्हणजेच रोगमुक्त आहेत का हे पाहणे कठीण होते. त्यामुळे जी रोपे मिळतात ती क्लीन असावी, कीडमुक्त असावी, यासाठी क्लीन प्लांट तयार करण्यात येणार आहेत. देशातील नऊ पैकी तीन प्लांट हे महाराष्ट्रात राहणार असून, पुण्यामध्ये द्राक्षासाठी, सोलापूरमध्ये डाळिंबासाठी व नागपूर मध्ये संत्र्याची रोपे या प्लांटद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध होतील. वर्षाला या नऊ क्लीन प्लांट द्वारे सुमारे ८ करोड क्लीन व कीडमुक्त रोपे उपलब्ध होणार आहेत. यासाठी ३०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. याबरोबरच नर्सरी उभारण्यात येणार असून जे शेतकरी नर्सरी उभारतील त्यांना आर्थिक मदत केंद्राकडून दिली जाणार आहे.

चौहान म्हणाले, देशातील हॉर्टिकल्चरचा हब हा महाराष्ट्र असून,




संत्री, चिक्कू, द्राक्ष, आंबे हे अद्भुत आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आपल्या कष्टाने व महाराष्ट्र शासनाच्या मदतीने जी हॉर्टिकल्चर मध्ये क्रांती केली आहे ती गौरवशाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी पर हेक्टरी उत्पादन वाढविणे उत्पादन खर्च कमी करणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे आधी उपाय करण्यासाठी केंद्र सरकार नेहमीच प्रयत्नशील आहेत आज लॅबमध्ये वैज्ञानिक शेती संशोधन करतात पण शेतकरी शेतात राबतो त्यामुळे लॅब व शेती जोडली गेली तर शेतीतील प्रगती हे आणखी जोराने होऊ शकेल असेही चौहान यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज सर्वात जास्त तंत्रज्ञानाची आवश्यकता कृषी क्षेत्राला आहे. वातावरणातील बदलामुळे उत्पादन खर्च वाढत आहे तर, शेतीची उत्पादकता कमी होत आहे. अशावेळी शेतीमध्ये विकसित तंत्रज्ञान आले तर शेतीची उत्पादकता वाढून उत्पादन खर्चही कमी होईल. शासनाने आयोजित केलेली देशातील ही पहिली कृषी हॅकाथॉन ( संशोधन स्पर्धा) व या स्पर्धेतील संकल्पना शेतीच्या बांधापर्यंत पोहोचण्याचे काम झाले तर, त्याचा शेती क्षेत्राला व शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. आता शेती क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्तमुळे ( ए आय) मोठ्या प्रमाणात परिवर्तित होत असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. दरम्यान केंद्राच्या कृषी विभागानेही महाराष्ट्राला उत्पादन क्षेत्रासाठी मोठी मदत नेहमीच केली आहे. त्यामुळेच देशाच्या मध्ये महाराष्ट्राचे स्थान अग्रभागी राहिले असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राजमाता जिजाऊंनी बाल शिवाजींचे हस्ते पुण्यात सोन्याचा नांगर चालवून शेतीच्या प्रगतीची सुरुवात केली. ती आज या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ए आयचा वापर करून तीसमृद्ध होत आहे. शासनाकडून आयोजित कृषी हॅकाथॉन ही कृषी क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल ठरेल, यातील संशोधन शेतीला आणखीन बळ देईल असे पवारांनी सांगितले.सातत्याने वाढणारी लोकसंख्या कमी होणारे शेतीचे क्षेत्र, वाढते नागरीकरण, निसर्गाचा असमतोल ही आव्हाने कृषी क्षेत्रा समोर आहेत. त्यामुळेच कमी खर्चात कमी खते वापरून व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांना दिशा देण्याचे काम कृषी हॅकाथॉनच्या माध्यमातून होईल असा विश्वास पवार यांनी यावेळी व्यक्त केला. समारोप कार्यक्रमात या तीन दिवसीय कृषी हॅकाथॉनमधील विजेत्यांना व उपविजेत्याना सव्वा कोटी रुपयांची पारितोषिके चौहान व फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले. यावेळी हॅकाथॉन आयोजनात महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांचा खास सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालय, पुणे यांच्या सहकार्याने ही कृषी हॅकाथॉन आयोजित करण्यात आली होती.

## प्राध्यापकाने विद्यार्थ्यांना बेकायदा पेपर लिहिण्याची दिली संधी; वाघोलीतील धक्कादायक प्रकार, पोलिसांनी चौघांना ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

प्राध्यापकाने साथीदारांच्या मदतीने अभियांत्रिकीचे शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांकडून पैसे स्वीकारून त्यांना परिक्षेचे पेपर बेकायदेशीर मार्गाने पुन्हा लिहण्याची संधी दिल्याचा धक्कादायक प्रकार गुन्हे शाखेच्या युनीट सहाने उघडकीस आणला आहे. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मॅथेमॅटीक्स २ या विषयाचे लिहीलेले उत्तरपत्रिकेचे ६ बंडल, २ लाख ६ हजारांची रोकड, उत्तरपत्रिका ठेवलेली कंट्रोल रुमची चावी असे साहित्य जप्त केले आहे.



प्रा. प्रतिक किसन सातव ( ३७ रा. केसनंद वाघोली ), आदित्य यशवंत खिलारे ( २० रा. वाघोली), अमोल आशोक नागरगोजे ( १९ रा. वाघोली), अनिकेत शिवाजी रोडे ( २० रा. वाघोली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. वाघोलीतील पार्वतीबाई गेणबा मोझे कॉलेज ऑफ इंजिनियरींग कॉलेजचा प्राध्यापक प्रतीक सातव हा विद्यार्थ्यांकडून पैसे घेउन त्यांना मॅथेमॅटीक्स २ चा पेपर रात्री कॉलेजमध्ये लिहण्यासाठी देणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार ३ जूनला मध्यरात्रीच्या सुमारास पथकाने कॉलेजमधील मेकॅनिकल इंजिनियरींग कॅडकॅम विभागात छापा टाकला. त्यावेळी प्राध्यापक प्रतीक सातव हा साथीदारांच्या मदतीने सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाचे इंजिनियरींग मॅथेमॅटीक्स २ या विषयाचे लिहिलेल्या उत्तरपत्रिकेचे ६ बंडल, रोकड, उत्तरपत्रिका ठेवण्यात आलेल्या कंट्रोल रुमची चावीसह मिळून आला. तसेच कॉलेजमधे शिकणारे प्रथम वर्षाचे ८ विदयार्थी मिळुन आले. प्राध्यापक सातव व त्याचे साथीदारांनी ज्या विद्यार्थ्यांना इंजिनियरींग मॅथेमॅटीक्स २ या विषयामध्ये नापास होण्याची भिती वाटते अशा विद्यार्थ्यांना हेरुन ठेवले होते.

## वैष्णवीची आत्महत्या की हत्या? फॅन ७१ किलो वजन पिलवू शकतो का? फॉरेन्सिक तपासाकडे सर्वांचे लक्ष

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी तपासाची चक्रे वेगवान गतीने फिरवण्यास सुरूवात केली आहे. वैष्णवीचा पती, सासू, सासरे, नणंद आणि दीर यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर या प्रकरणातील महत्वाची कडी असलेल्या निलेश चव्हाण याला देखील पोलिसांनी नेपाळ सीमेवरून ताब्यात घेतले. आता या सगळ्यात या प्रकरणात एक महत्वाची घडामोड घडणार आहे. वैष्णवीने आत्महत्या केली की तिची हत्या करण्यात आली. या संदर्भात ठोस पुरावा हाती लागू शकतो.



वैष्णवीने १६ मे रोजी तिच्या सासरच्या घरी आत्महत्या केली होती. खोलीतील पंख्याला लटकून साडीच्या साह्याने तिने गळफास घेतला होता. यामुळे वैष्णवीची साडी आणि पंखा या दोन्ही गोष्टी फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवण्यात आल्या आहेत. तसेच आोरोपी निलेश चव्हाणचा लॅपटॉप आणि मोबाईल देखील तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्याच्या लॅपटॉपमध्ये अनेक पुरावे सापडण्याची शक्यता आहे.

पंखा ७१ किलो वजन पेलवू शकतो का?

वैष्णवीने १६ मे रोजी आत्महत्या केल्यानंतर १७ मे रोजी या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी पंचनामा केला त्यावेळी तिचे वजय ७१ किलो असल्याची नोंद करण्यात आली होती. त्यामुळे तिने ज्या पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेतला, तो पंखा ७१ किलो वजन पेलवू शकतो का? याची तपासाणी करण्यासाठी या वस्तू फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात येणार आहेत.

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात अटकेत असणारे तिचे सासरे राजेंद्र हगवणे, सुशील हगवणे आणि निलेश चव्हाण यांची पोलीस कोठडी आज संपत आहे. त्यामुळे त्यांना आज न्यायालयात हजर केले जाणार आहे. यापूर्वी पुणे सत्र न्यायालयाने वैष्णवीचा पती शशांक हगवणे, लता हगवणे आणि करिष्मा हगवणे यांना न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे.

## जेसीबी व्यवहार फसवणूक प्रकरणी हगवणे मायलेकाला तीन दिवसाची पोलिस कोठडी

**खेड । प्रतिनिधी**

जेसीबी व्यवहारात फसवणूक केल्यावरून मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी तिची सासू आणि नवरा या हगवणे मायलेकाला राजगुरुनगर येथील प्रथम वर्ग न्यादंडाधिकारी जे. बी. म्हस्के यांनी मंगळवारी (दि ३)तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.



खरेदीची मूळ कागदपत्रे आरोपींकडे आहेत, व्यवहार पूर्ण झाल्यावर ते नंतर देऊ असं ते वारंवार म्हणत आलेत. त्यामुळं आम्ही ते आत्ताच सादर करु शकत नाही. त्याचाच शोध घ्यायचा आहे, असे सरकारी वकीलांनी सांगितले तर तपास अधिकारी म्हणाले मे २०२४ च्या तक्रारीनंतर आरोपी हगवणे याने जबाब दिला होता. यामध्ये हा जेसीबी विक्री केल्याचं त्याने स्वतःच कबुल केलं आहे. हा जबाब मी न्यायायला पुढं सादर करत आहे.

हगवणेचे वकील म्हणाले, जेसीबी अथवा इतर मशिनरी भाडे तत्वावर दिली जाते. त्याप्रमाणे हे जेसीबी भाडे तत्वावर दिले होते. उलट त्यांनी अपुरे भाडे दिले. जर त्यांनी जेसीबी खरेदी केला असेल तर करारनामा कुठं आहे? किमान फोटो कॉपी तरी हवी होती? आता कोणती तरी कागदपत्रे सादर करुन हगवणे यांना फासवण्याचा प्रयत्न होत आहे.

हगवणेंचे वकील युक्तिवाद करताना म्हणाले की, हगवणे बंदूक परवानाधारक आहे, हे माध्यमांमध्ये आलेलं आहे. उलट ५ ते १० लाख रुपये प्रशांत येळवंडे यांच्याकडून येणं बाकी आहे. हे फक्त षडयंत्र आहे, हगवणे कुटुंबाला जास्तीतजास्त तुरुंगात ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. बँकेचा जो एजंट आहे, त्याच्याकडे स्वतंत्र चौकशी करता येऊ शकते. यासाठी पोलीस कोठडीची गरज नाही. हगवणे माय-लेकाला न्यायालय कोठडी द्यावी.

## कंत्राटदरांना 'ब्लॅकलिस्ट'मध्ये टाकून कारवाई करा, अन्यथा; शरद पवारांची राष्ट्रवादी आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसाखाली पुणे शहरामध्ये पावसाने अक्षरशः थैमान घातले होते. अवकाळी पावसाचा जोर वाढल्यामुळे पुणे शहर पूर्णपणे जलमय झाले होते. दोन तास तुफान पाऊस पडल्यानंतर शहरातील रस्त्यांना नदी-नाल्यांचे स्वरुप आले होते. अशातचं आता रस्त्यावर साचलेल्या पावसाच्या पाण्यावरुन शरद पवारांची राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते गिरीश गुरनानी यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे कोथरूड विधानसभेचे युवक अध्यक्ष गिरीश गुरनानी यांनी कोथरूड क्षेत्रीय कार्यालय प्रमुख विजय नायकल यांची भेट घेऊन निवेदन दिले. तसेचं कंत्राटदरांना तात्काळ ब्लॅकलिस्ट मध्ये टाकून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आपल्या दालनाबाहेर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा गुरनानी यांनी दिला.



गुरनानी म्हणाले, कोथरूडमध्ये नुकताच पाऊस झाला व या पावसात रस्त्यात तुडुंब भरलेले पाणी आम्हा सर्व कोथरूडकरांना पाहायला मिळाले व त्यातून झालेली ट्रॅफिक, आत्ताच केलेल्या रस्त्याची झालेली चाळण, चेंबर्समधून येणारे घाण पाणी हे सुद्धा कोथरूडकरांनी पाहिले आहे. आपण या सर्व उपयोजना पावसाच्या आगोदर करणे अपेक्षित होतं पण कॉन्ट्रॅक्टदाराकडून ही सर्व कामे पूर्ण झालेली नाहीत त्यामुळेच कोथरूडकरांना या सर्व गोष्टींचा नाहक त्रास सहन करावा लागला. निकृष्ट दर्जाचे केलेल्या रस्त्याचे काम, नालेसफाईचे काम हे आता तरी पूर्ण करावे, जेणेकरून कोथरूडकरांना अजून अडचणी सहन कराव्या लागणार नाहीत. असं गुरनानी म्हणाले.

## पवारांविषयी वादग्रस्त विधानाप्रकरणी पडळकरांना दिलासा, बारामती न्यायालयाने काय निर्णय दिला?



**बारामती । प्रतिनिधी**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याच्या खटल्यातून भाजपचे आमदार गोपिचंद कुंडलिक पडळकर यांची बारामतीचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डी. पी. पुजारी यांनी निर्दोष मुक्तता केली. खटल्याच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर पडळकर हे मंगळवारी (दि. ३) बारामती न्यायालयात आले होते.

सन २०२० मध्ये आ. पडळकर यांनी शरद पवार म्हणजे महाराष्ट्राला झालेला कोरोना असे वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी राष्ट्रवादीचे तत्कालीन युवक शहराध्यक्ष अमर धुमाळ यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात पडळकर यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी पडळकर यांच्या विरोधात भारतीय दंड विधान ५०५ (२) अन्वये पडळकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. सहायक पोलिस निरीक्षक मुकुंद पालवे यांनी या प्रकरणाचा तपास करत पडळकर यांच्या विरोधात बारामती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

या गुन्ह्यात जामिन घेतल्यानंतर वारंवार समन्स बजावून देखील पडळकर हे न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरोधात अटक वॉरंट जारी केले होते. येथील न्यायाधिश पुजारी यांच्यासमोर हा खटला चालला. या खटल्यात चार साक्षीदार तपासण्यात आले. पोलिसांनी पडळकर यांच्या विरोधात ज्या कलमान्वये गुन्हा दाखल केला ते त्यांच्यासाठी लागूच होत नसल्याचा युक्तिवाद पडळकर यांच्या वकीलांनी केला. पंथ, धर्म, समुदाय यासाठी हे कलम लावले जाते. पडळकर यांच्या विधानाच्या अनुषंगाने कोणतीही दंगल भडकली नव्हती, अथवा धर्म-जातींमध्ये अराजकता निर्माण झालेली नव्हती. त्यामुळे हे कलम लावणे गैरलागू आहे. त्यांचे विधान व्यक्तिशः होते, समुदायाला अनुसरून नव्हते, असा युक्तिवाद करण्यात आला. न्यायालयाने तो ग्राह्य धरत पडळकर यांची निर्दोष मुक्तता केली.

निकालानंतर पडळकर म्हणाले, या प्रकरणी माझ्या विरोधात बारामती न्यायालयात खटला सुरु होता. त्यात माझी निर्दोष मुक्तता केली आहे.

# बोगस, बियाणे कीटकनाशकांची विक्री करणाऱ्यांची गय केली जाणार नाही: केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान

**नारायणगाव । प्रतिनिधी**

बोगस कीटकनाशकांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांची यापुढे गय केली जाणार नाही. कडक कारवाई करण्यासाठी कायदा तयार केला जाईल. विकसित कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून देशातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून विभागनिहाय शेतकरी व शेती पिकांच्या समस्या समजून घेऊन शेती विकासाचा आराखडा तयार केला जाईल. अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली.

विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत केंद्रीय कृषिमंत्री चौहान, राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज येथील टोमॅटो उपबाजार व कृषी विज्ञान केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी फळ भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधून समस्यांची माहिती घेतली. कृषी विज्ञान केंद्र आयोजित पीक प्रात्यक्षिक प्रदर्शनाच्या उदघाटनानंतर त्यांनी शेतकरी मेळाव्यात शेतकऱ्यांशी संवाद साधून शेती



समस्यांची माहिती घेऊन मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर होते. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे,खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे,माजी आमदार अतुल बेनके, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजित खैरे,विश्वस्त प्रकाश पाटे,उपाध्यक्ष शशिकांत वाजगे,कार्यवाह रवींद्र पारगावकर, संचालक डॉ.आनंद कुलकर्णी,ऋषिकेश मेहेर,डॉ.संदीप डोळे, एकनाथ शेटे, कृषी आयुक्त सुरज मांढरे,डॉ.एस के सिंग आदि उपस्थित होते.

केंद्रीय कृषिमंत्री चौहान म्हणाले एप्रिल मे महिन्यात झालेला पाऊस, वाढलेले तापमान याचा परिणाम देशातील शेती उत्पादनावर होत आहे. पिक वाचवण्यासाठी मोठा भांडवली खर्च शेतकरी करतात.

शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. नवीन तंत्रज्ञान व फळ भाजीपाला पिकाच्या विविध जाती विकसित करणे आवश्यक आहे.कोणती औषधे फवारावीत, त्याचे प्रमाण काय असावे, मातीचे आरोग्य तपासून त्यानुसार कोणत्या खतांची गरज आहे. उत्पन्न वाढवण्यासाठी नवीन विकसित जातींची माहिती, पिकांची टिकाऊ क्षमता कशी वाढेल ही माहिती शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. विकसित कृषी संकल्प अभियानाचा उद्देश शेतकरी समस्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन समजून घेणे व त्यावर उपाययोजना करून देशातील शेतीला योग्य दिशा देणे हा आहे. यापुढे कृषी अधिकारी,कृषी शास्त्रज्ञ व मंत्री कार्यालयात बसून शेती विकासाच्या योजना राबवणार नाहीत.शेतीच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना केल्या जातील.द्राक्ष,टोमॅटो, कांदा या नाशवंत पिकांपासून उपउत्पादने तयार करण्यासाठी विविध जाती विकसित करणे आवश्यक आहे.कृषी अधिकारी,कृषी शास्त्रज्ञ, मंत्री शेतकऱ्यांच्या सेवेसाठी आहेत.या पुढे कार्यालयात बसून निर्णय घेतला जाणार नाही. शेतकरी सेवेसाठी मी कृषी मंत्री आहे.आयसीआर कडे सोळा हजार शास्त्रज्ञ आहेत.कृषी शास्त्रज्ञ आपल्या संस्थेत प्रयोगशाळेतून काम करतात. त्यांचा शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद नसतो. त्यामुळे शेती हिताचे निर्णय होत नाहीत. केंद्र शासनाने एक योजना तयार केली असून यापुढे शेतकरी कोणत्याही बाजारपेठेत शेतमाल विक्रीसाठी घेऊन गेल्यास त्याचा वाहतूक खर्च केंद्र सरकार करेल.

कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर म्हणाले कृषी विज्ञान केंद्र मार्फत ३० शास्त्रज्ञ दोन लाख शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी प्रगतीसाठी कृषी विज्ञान केंद्र कटिबद्ध आहे. कोल्ड हाऊस उभारणीसाठी व ऑडिटोरियम उभारणीसाठी भारतीय कृषी अनुसंधान विभागाने कृषी विज्ञान केंद्राला मदत करावी. त्याबाबतचा प्रस्ताव पाठवला जाईल.